# मिशन

# त्र

दोन अंकी नाटक



डॉ नितिन मोरे

# मिशन ब्र..!

## (दोन अंकी नाटक)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# मिशन ब्र..!

# हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

# तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा. सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मिशन ब्र..!

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

मुखपृष्ठ : चैतन्य चव्हाण

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन :- १३ एप्रिल २०२२ ,चैत्र शुक्ल द्वादशी शके १९४४

दुसरी रंगावृत्ती- १४ एप्रिल २०२३

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे सदतिसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# मिशन ब्र..!

## (दोन अंकी नाटक)

डॉ. नितीन मोरे

# मिशन ब्र..!

## अंक पहिला

# प्रवेश १

*एक आडवाटेचा बसस्टॉप. आजूबाजूस फक्त काही झाडे. जवळ बसायला एक बाकडे.*

सूत्रधार:

*नमस्कार मंडळी. रामराम.*

*त्याचे काय आहे ना मंडळी, एका माणसाचे भविष्य दुसऱ्याशी निगडीत असते असे म्हणतात. कोण म्हणतात? एक.. जगाच्या पाठीवर इतके महान लोक होऊन गेले.. कोणी न कोणी म्हटल्याशिवाय कसे राहिल.. दोन.. कोण म्हणते यापेक्षा काय म्हटले हे महत्त्वाचे नाही का? आणि तीन.. हे वाक्य माझेच आहे बरे! तर कसे?*

*आज आपण भेटूयात ते दोन भावांना.. त्यातील छोटा .. म्हणजे तसा छोटा नव्हे .. तर मोठया हून छोटा.. तर छोट्याने आपली लाईन जमवली आहे.. त्यात त्याच्या मोठयाचा अडसर.. मोठा तसा ब्रह्मचर्याचे पालन करण्याची शपथ घेऊन बसलेला.. ती शपथ तोडावी तर त्याला त्याच्या गुरूचा अडसर.. गुरूजींना आपल्या ब्रह्मचर्याचा*

*अभिमान .. त्यामुळे त्या अभिमानाचा अडसर .. म्हणजे झालं ना त्रांगडं लोक हो! उतरंडीत सर्वात खाली कोण? लबाड मोठे वरती नि खालचे बिचारे छोटे..*

*आता हा आमचा समीर. सावंत कुलोत्पन्न. द्वितीय पुत्र. सुपुत्र म्हणायला हरकत नाही तशी. त्याची मैत्रीण कम प्रेयसी कम भावी अर्धांगिनी.. सायली..*

*तो काय करतोय? आता या प्रश्नाला वेगवेगळी उत्तरे संभवतात .. तो सध्या आपल्या भविष्याचा विचार करतोय हे त्यातील एक उत्तर.. पण नाही, तो इथे सध्या काय करतोय? तर या बसस्टॉपवर प्रियेची वाट पाहतोय .. आणि हवी ती बस जशी वेळेवर येत नाही आणि वाट पहायला लावते तशी त्याची सखी कधीच वेळेवर येत नाही..*

*मंडळी, तसा मी कोणाच्या अध्यात मध्यात नसतो, पण सूत्रधाराचे कर्तव्य म्हणून ऐकतो त्यांचे.. चोरून. ऐकावेच लागते.. म्हणजे उदाहरणार्थ*

*काय तर म्हणे..*

*जमून आलीय ना गडे*

*प्रिये.. तुझी माझी जोडी..*

*समीर म्हणाला तर हिने काय द्यावे उत्तर?*

*कसली काय चापलूसी*

*चल हट नको लाडीगोडी*

*हा झाला एक मासला.*

*तर मंडळी अशी आहे ती.*

*अर्थात त्याच्या नजरेला ती सुंदर साजिरी लाजरी गोजरी.. मंजिरी ती सखी साजणी.. अशीच दिसते. मला कसे ठाऊक? अहो आज समीर. बसस्टॉपवर कधीचा उभा आहे.. त्याने उभ्या उभ्या कवितेसारखे शब्द जमवले नि जुळवले ही. पण बसस्टॉपवरल्या बस सारखा तिचा पत्ता नाही.*

*तो तिला म्हणाला ही एकदा, डोळ्यांत प्राण आणून बघतो गं वाट.. त्यावर तिने काय म्हणावे? प्राण? मला वाटले प्रेम.. प्रेम चोप्रा आला असेल डोळ्यांत ..*

*समीर म्हणतो, अश्शी आहेस ना तू..*

*पण लोकहो, आज समीरची तशी सटकलीय.. म्हणजे त्याने ठरवून टाकलेय.. उशीर करायचा! म्हणजे आलाय तो भेटीआतुर वेळेआधी.. ह्याच बसस्टॉपवर..*

*पण आता बघा.. जाऊन मागे लपेल तो.. त्याची सायली आली की काही वेळाने हळूच येईल बाहेर.. मग बघाच त्याची गंमत.. आणि मग बघा काय काय नि कसे काय उलगडतेय सारे..*

*समीर निघून बसस्टॉप मागे जाता जाता अंधार.. परत उजेड होतो..*

*तोच बसस्टॉप. सायली वाट बघत उभी आहे. घड्याळात बघते वारंवार. आधी हसतमुख असलेली ती हळूहळू रागावल्या सारखी होते. घड्याळ पाहत फेऱ्या मारायला लागते. थोड्यावेळाने धावत धावत येतो.*

सायली:- समीर, असं रे काय? तू इतक्या उशिरा का आलास?

समीर:- उशिरा? अगं शिरा ताणून का बोलतेस? शिरा खात होतो म्हणून उशिरा आलो..

सायली:- कॅयच्या कॅय जोक मारू नकोस. तुला तरी हसू येईल का? मुळात तू लेट का झालास?

समीर:- लेट? लेट लिव्ह अँड लिव्ह .. त्या गोंधळात गॉट लेट टू लिव्ह फ्रॉम होम.. त्यात वर शिरा खायचा म्हणजे वेळ लागणारच ना?

सायली:- चुप रे..

समीर:- अगं खरंच सांग, आपल्या उशिरा येण्याचे गुणोत्तर काय? तू दहा वेळेस उशिरा येतेस.. तेव्हा मला एकदा. मी हिशेब ठेवलाय..

ती उठून तरातरा चालू लागते..

समीर:- अगं थांब.. वेट.. पाऊस येईल.. तू होशील वेट.. एवढया पटापटा नकोस चालू.. कमी होईल तुझे वेट.. थांब .. नको सोडून जाऊस.. रंगमहाल.. पोहोचशील घरी थेट.. वेट..

*समीर मागे मागे जाऊन तिला थांबवतो..*

समीर:- शुक शुक.. सायली.. साय ती थांब..

सायली:- आता कशाला येतोस.. मी चालले. तू हिशेब करत बस. दहा वेळा म्हणे. इतका हिशेबी असशील असे वाटले नव्हते. गुणोत्तर म्हणे गुणोत्तर. स्वतःचे गुण पहा मग मिळेल उत्तर ..

समीर:- वा! दॅटस् वेल सेड! तुला माझा गुण लागला दिसतोय.. ग्रेट! का अशी रूसशी.. तुला ठाऊकै रूसलीस की फुगशील.. पुरीसारखी टम्म ..

सायली:- तुला निरर्थक बोलण्याशिवाय दुसरे काही येत नाही?

समीर:- ऑफ्कोर्स नॉट. अजून खूप गोष्टी येतात.. झालंच तर..

सायली:- ते सोड. उशीर का झाला तुला? इकडे वाट पाहून मला कंटाळा आला..

समीर:- छे! माझ्या डोळ्यांच्या खाचा झाल्या म्हण की.. डायलॉग कसा चुरचुरीत हवा. किंवा वाट पाहून माझा इतका पुतळा झाला की गावातले कावळे .. आणि कबुतरंही.. माझा पत्ता शोधत आले.. कधी एकदा डोक्यावर बसतो आणि..

सायली:- वायफळ बडबड नकोय..

समीर:- दॅट्स बिकॉज श्रीखंड .. त्यात होतं जायफळ. मग बोलणार ना मी वायफळ? अगं शिरा नाही, श्रीखंड खाण्यात उशीर झाला.. वर त्यात जायफळ.. झोप आली .. उशीर झाला.. हे त्याचेच फळ..

सायली:- तू फालतू बडबड बंद करणार नसशील तर मी चालले..

समीर:- ओह! मला वाटलं तू आधीच चाललेलीस की काय.. मी गाणं गाणार होतो .. रूक जा ओ जाने वाली रूक जा.. बरं झालं नाही गायलो .. म्हणजे पुढे कुठे उपयोगी पडेल! काटक सर .. नाही का टकसर .. नाही काटकसर करावी ती मी.. शब्द शब्द पुरवून वापरतो मी.

सायली:- तू उगाच बडबड करू नकोस. एकतर उशिरा येतोस नि वर मला इतके सारे ऐकवतोस. साधे सॉरी म्हणण्याचे मॅनर्स नाहीत.

समीर:- सॉरी.. लॉर्ड वायली.. नाही सायली मॅडम .. येण्यास उशीर झाल्याबद्दल हा नाचीज आपली क्षमायाचना करण्यासाठी हा शर्ट पसरवीत आहे. इतके सारे बोलल्याबद्दलही क्षमायाचना करत आहे हा हातरूमाल पसरवून .. अजून पसरवण्यासारखे

काही नाही.. म्हणून अभय असल्यास या पामराची एक विनंती आहे..

सायली:- उगाच नाटकीपणा नकोय..

समीर:- जो आज्ञा हुजूर. यापुढे फक्त कारण असताना नाटकीपणा.. तुमचा हुकूम सर आंखोंपर..

सायली:- आता बडबड बंद नाही केलीस तर मी खरोखर निघून जाईन..

समीर:- ओह! थ्यांक्स. म्हणजे आता पर्यंत फक्त ट्रोजन हॉर्स..

*सायली रागाने बघते.. तो बोलता बोलता आवाज एकदम खाली आणतो. सायली जवळच्या बाकावर बसते. समीर तिच्यामागे उभा राहून एखाद्या हॉटेलात खुर्ची मागे सरकवावी तशी ॲक्शन करतो आणिबाजूला येऊन निरागस मुलासारखा बघत बसतो. ते पाहून सायलीला हसू फुटते.*

सायली:- तू पण असा आहेस ना..

समीर:- थ्यांक्स.. हंसी तो फंसी.. काय टेन्शन देतेस तू..

सायली:- मी? की तू?

समीर:- आता परत मी काय केलेय?

सायली:- किती दिवस हे असे बसस्टॉपवर भेटायचेय?

समीर:- सॉरी.. उद्या समुद्र किनारी भेटूयात? कल्पना कर.. समुंदर की लहरें.. मस्त हवा सुटलीय .. तू आणि मी.. सिनेमात दाखवतात तसे एका शहाळ्यात दोन स्ट्रॉ घालून नारळपाणी पितोय.. नारळवाला ओरडतोय.. इल्ले.. शेअरिंग नॉटौलाऊड सार .. की रूपम मध्ये? तिकडे चांगला सिनेमा लागलाय पण.. डिस्टर्ब होणार आपल्याला.. नाहीतर अमृत पंजाब मध्ये .. पण तिकडे न खाता बसू देत नाही तो सरदारजी .. बिलाचे पैसे आणावे कोठून? कडकी .. की त्या बटरफ्लाय गार्डन मध्ये? तिकडे गर्दी खूप.. तिकडे गेलं की वाटतं या पोरापोरींना दुसरा काहीच उद्योग नाही की काय.. फ्लाय लाईक बट्टर फ्लाय! किती फरक आहे नाही? नुसती फ्लाय म्हणजे मक्षिका .. तिला लोणी लावले की बटर फ्लाय! मस्का वर्कस यार!

सायली:- तू परत सुरू झालास?

समीर:- म्हणजे? मी इतका गंभीरपणे ऑप्शन्सचा विचार करतोय ..

सायली:- गंभीरपणे? तसं असतं तर आधीच विचार केला असतास..

समीर:- कसला? कुठे कुठे भेटायचे त्याचा? अगं तू पहिलीच .. नो पास्ट एक्स्पिरियन्स..

सायली:- आता मी खरेच निघून जाईन. चावटपणा सुचतो तुला. उगाच माझ्या मागे लागलास कशाला?

समीर:- त्याला काय इलाज? दिल है की मानता नहीं रानी..

सायली:- हा डायलॉग दुसरीकडे.. मुळात तुला जमणार नव्हते तर मला कशाला ..

समीर:- तू कशाबद्दल बोलतेयस राणी?

सायली:- राणी म्हणे.. घरी माझ्या लग्नाची बोलणी सुरू आहेत.. काही दिवसांनी कोणीतरी येणार आहे बघायला.. एक दिवस मला जावे लागले ना तर डोळे उघडतील तुझे..

समीर:- मग काय करू? लगीन घाई.. घरात माझ्या? शक्य नाही. तुला माहितीच आहे ना..

सायली:- पण तुला तर माझ्या आधीपासून माहिती होते ना? मग कशाला माझ्या मागे लागलास .. राहिला असतास तू पण तसाच.. एक शब्द बोलू नकोस तू.. नाहीतर मीच तुझ्या घरी येते. बघते काय ते..

समीर:- बाप रे! काही खरं नाही.

सायली:- आणि मी नाही आले ना तरी ही काही खरं नाही.. नाहीतर असं कर ना.. मी जाईन लग्न होऊन तेव्हा निरोप द्यायला ये ना..

समीर:- सबको राम राम राम? का इतके कठोर वचन प्रिये.. जुन्या नाटकात असतो तर चटकन् गाणे गावे असा प्रसंग हा.. का येई दाटुन तुझिया नयनात ग पाणी.. अशी ही काय आणीबाणी..

सायली:- तू तुझी सवय सोडू नकोस.. मला सोड..

(डोळयांत पाणी येते ..)

समीर:- मेहबूबा.. तुम्हारी आंखोमें दिखाई दे रहा है समुंदर.. प्रिये तुझ्या डोळयांत मला सागराच्या लाटा दिसताहेत ..

सायली:- (रडत) लाटा कसल्या.. मी ॲक्च्युअली रडतेय ..

# प्रवेश २

*समीरचे घर. त्याचा भाऊ धनंजय बसला आहे. अंगाने भरलेला. व्यायामाचे शरीर असलेला. मागे पर्वत उचलणाऱ्या हनुमानाचे चित्र. काहीतरी करत बसलाय. दरवाजावर टक टक होतेय. धनंजय उठून बाहेर जातो. एक बुरख्यातील मुलगी आत शिरते. नखशिखांत काळ्या बुरख्यात.*

(निवेदन सुरूवातीस)

*प्रसंग बाका आहे मंडळी. बाका म्हणजे गंभीर .. अतिगंभीर!*

*समीरच्या घरी त्याची येणार कशी परी.. त्याचा तो बंधुराज जर लग्नास तयारच नसेल तरी?*

*आणि इकडे आपली सायली.. तिची गोष्ट नाही वायली..*

*मंडळी, सायलीचे तरी काय चुकीचे आहे? सुंदर सुशील गृहकृत्यदक्ष वगैरे बनून लग्नाच्या बाजारात बिचारीस तिच्या घरून उभी केली जात आहे. मुलीचे वय उलटून चालले म्हणजे तरणी पोर नि जिवाला घोर.. तिचे आईवडील तिला विवाह बंधनात*

*अडकवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करताहेत. सायली प्रयत्न निकराने हाणून पाडते आहे.. अजून काय करेल बिचारी? विचार करा.. कोणी न कोणी तिच्या घरी येत आहे. बिचारी कांदेपोह्यांच्या बशा भरून सर्वांना खाऊ घालते आहे.. सगळ्यांना चहा पाजते आहे आणि त्यांची पाठ वळताच दरवेळी नकार देण्यासाठी नवनवीन कारण शोधून काढते आहे.. किती दिवस तग धरून राहिल बिचारी?*

*आणि समीर? त्याला आपल्या थोरल्या बंधुराजाची ब्रह्मचर्याची शपथ ठाऊक आहे. त्याचा हनुमान भक्त बजरंग शिष्य भ्राता जर अशी शपथ घेऊन बसला असेल ते बिचाऱ्या समीरास कोण असेल बरे त्राता? तो तरी सायलीला प्रेमाच्या आणाभाकांशिवाय दुसरे वचन कसे देणार?*

*आहे ना प्रसंग बाका?*

*पण म्हणून मोडून पडणारी आपली मंडळी नाहीत. मंडळी, ही मंडळी अशातशाने हार मानणारी नाहीत. प्यार किया तो डरना क्या म्हणणारी दोघे.. आता समीरच्या ब्रह्मचारी भावाची शपथ मोडण्यासाठी काहीतरी केल्याशिवाय कसे राहतील? काही न काही हातपाय तर हलवावे लागतीलच .. पाण्यात पडले की पोहता येते..*

*तसे प्रेमसागरात पडले की किनाऱ्यावर पोहोचवण्यासाठी हातपाय मारावेच लागतील .. तसे दोघे मारताहेत.. मारतीलच..*

*क्या से क्या हो गया.. तेरे प्यार में.. म्हणत आता काय करतील दोघे..*

*पाहूया प्रत्यक्षच..*

धनंजय:- कोण तुम्ही?

मुलगी:- हम? मी अबिदा. अबिदा उस्मान साठे.

धनंजय:- काय काम?

अबिदा:- मलेरिया सर्व्हे .. मलेरियाची लस कोणी कोणी घेतलीय त्याचा सर्व्हे.

धनंजय:- मलेरिया? मलेरियाची लस? कधी आली?

अबिदा:- अय्यो.. आतीच ना मलेरिया की लस. तुमको नहीं पता?

*धनंजय मोबाईलवर गुगल सर्च करत..*

धनंजय:- नहीं.. मलेरियाची लस नाहीच आहे गुगलवर!

समीरः- गुगलवर? अरे धनंजयदादा आपले सायन्स इतक्या फास्ट डेव्हलप होतंय.. फास्ट फूड सारखे फास्ट सायन्स! मी तर वाचलं होतं मध्ये की मलेरियाची दोन इंजेक्शन्स लागतात ..

अबिदाः- जी हां. दाया और बाया! उजव्या बाजूला चावला मच्छर तर डावीकडील लस काम देते.. डाव्या बाजूला चावला तर उजव्या हातावरची..

समीरः- सायन्स किती पुढे गेलंय बघ..

अबिदाः- मला माहिती हवीय.. कोणी कोणी घेतलीय लस..

धनंजयः- अबिदाताई.. तुम्ही असे घराघरात फिरता.. दमला असाल नाही.

समीरः- अख्तरी.. पानी चाहिए?

धनंजयः- अख्तरी नाही. अबिदा.

अबिदाः- नाचीज को कोई अबिदा कहते हैं कोई अख्तरी!

धनंजयः- म्हणजे समीर तू यांना ओळखतोस?

समीरः- नाय रे.. पहिल्यांदा तर पाहतोय. (हळूच) पाहतोय कसला आत कोण आहे कोणाला ठाऊक! तर अबिदा ऊर्फ अख्तरी.. घ्या लिहून ..

अबिदा:- काय लिहू?

समीर:- अरे, सर्व्हे. मलेरिया व्हॅक्सिनचा.

धनंजय:- पण ही लस कधी आली?

समीर:- दादा, तू आणि तुझे बजरंग सर.. व्यायाम आणि ब्रह्मचर्य. तुझं दुसरीकडे कुठे लक्ष असतं का रे?

अबिदा:- ये ब्रह्मचर्य क्या है भाई?

समीर:- यह है तुम्हारा भाई.. धनंजय जरा समझवो त्यांना. समीरा मॅडम बसा..

धनंजय:- समीरा? हे कुठले नवीन नाव?

अबिदा:- हाय अल्ला. आप तो मेरा नाम बदलनेपर तुले हैं.. आमच्याकडे फक्त निकाह झाल्यावर नाव बदलतात ..

धनंजय:- तुमचं मराठी एकदम चांगलेय हां अबिदाताई..

अबिदा:- ते काय आहे आम्ही रत्नाग्रीतले. साठे. त्यामुळे मराठी येतं मला..

समीर:- आणि छान येतं. तुमच्या मंजूळ आवाजात ऐकायला कानाला गोड वाटतं.. अबिदा.. बाई..

धनंजय:- अरे तो सर्व्हे? सांगू सगळ्यांची नावं..

अबिदा:- आता घरात कोण आहे त्यांची सांगा फक्त. मैं वापस आऊंगी बाकी कोई आने के बाद..

धनंजय:- तुम्हाला कसे ठाऊक बाकी कोणी यायचे बाकी आहेत ते?

अबिदा:- हाय अल्ला.. एक अंदाज! म्हणजे मला काय वाटतं ना हे धनंजय आहेत.. त्यांची बायको म्हणजे पत्नी म्हणजे वाईफ बाहेर गेली असणार .. बघून कळतं ना. किती व्याकूळ नजरेने वाट पाहात आहेत..

धनंजय:- अबिदाताई, तुम्ही काय वाटेल ते बोलू नका .. वाईफ कसली. मी आजन्म आमरण ब्रह्मचारी..

अबिदा:- म्हणजे?

समीर:- म्हणजे तेच! धनंजयला लग्न करायचे नाही. तशी प्रतिज्ञा घेऊन बसलाय तो..

अबिदा:- मग ती व्याकूळ नजर? मेरी आंखे धोखा नहीं खा शकती.. आणि शादी न करने का क्या? विचार बदलला तर? चट मंगनी.. पट ब्याह. मी पण अशी पतिता ..

धनंजय:- पतिता? म्हणजे?

अबिदा:- अबला पतिता .. दोन शाद्या झाल्या माझ्या ..

समीर:- कधी? एकदम दोन? एवढयाशा वयात?

अबिदा:- एकदम नहीं. एक के बाद एक. धनंजय भाई, सुनाती हूं मैं मेरी दास्तान.. एक मेरा शोहर था पहला वाला.. शमसुद्दीन.. उसने तीन महिने में छोडा मुझको..

धनंजय:- कां बरे?

अबिदा:- काय सांगणार भाईजान. खुदगर्जी.. उसकी मर्जी. दर्जीने उसकी कमीज खराब की.. वह चिढ गया. समोर मी होते.. तीन वेळा तलाक तलाक तलाक बोलला नि मी अबला नारी घरातून बाहेर पडले.

समीर:- आणि नंबर टू?

अबिदा:- तिकडून आले नि मस्जिदीबाहेर दुवा मागत होते.. जैसे तैसे गुजारा हो रहा था. तिकडून एक अब्बास शेठची गाडी आली. त्याच्या जनानखान्यात नवी पोस्ट खाली झाली म्हणाला. बायकोची. मी रीतसर निकाह केला. त्याला मी साडेतीन महिन्यात सोडला ..

धनंजय:- रिव्हर्स तलाक?

अबिदा:- नहीं भाईजान.. वह बडा रंगीन आदमी था. मोबाईल का उसे भोत शौक. मैं उसको एक मेसेज भेजी.. सामनेसे. उसमें

लिखा था तलाक तलाक तलाक! मियां का ध्यान नहीं था. जोरसे उसने यह पढा और मैं बोरिया बिस्तर बांधके बोरीबंदर आ गई!

धनंजय:- इतक्या कमी वयात इतका अनुभव पदराशी, नाही बुरख्यात बांधला तुम्ही ताई..

समीर:- मग आता काय रोशन आरा?

धनंजय:- तू ताईंचे नाव कशाला बदलतोय?

अबिदा:- बिलकुल सही है लेकिन. पहिल्या शोहरने माझे नाव समीरा ठेवलेले.. दुसऱ्याने रोशन आरा!

धनंजय:- तुला कसे ठाऊक रे समीर?

समीर:- मला? मला कसे ठाऊक? हां.. जस्ट अ वाइल्ड गेस! आणि काय. हो की नाही अबिदा? दिसतातच ह्या रोशन आरा सारख्या! वाइल्ड गेस!

धनंजय:- वाइल्ड गेस! अहो बाई, लवकर लवकर सर्व्हे करून जा तुम्ही. तुमच्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी नकोत मला.

अबिदा:- ठीकै भाईजान. बोला.. तुमचे नाव?

धनंजय:- धनंजय बाबासाहेब सावंत.

अबिदा:- रत्नाग्रीतले की काय?

धनंजय:- हुं. तुम्ही पण तिकडच्याच..

अबिदा:- वय?

धनंजय:- किती वाटतेय?

अबिदा:- मला विचाराल तर दोन मुलांचा बाप वाटता तुम्ही.

धनंजय:- काही ही काय बोलता?

अबिदा:- मग तुम्ही विचारलेच कशाला? हमने जो लगा कह दिया. अल्ला, तुम तो बुरा मान गये.. हां.. तर वय?

धनंजय:- एकोणतीस..

अबिदा:- पत्नीका नाम?

धनंजय:- तुम्ही विसरता कशा हो परत परत.. मी ब्रह्मचारी..

अबिदा:- वह तो ठीकै. पण होणाऱ्या बायकोला काही नाम बिम तर असणार ना..

धनंजय:- ओह.. अबिदाताई.. एकतर कोणी होणारी नाही. काल नव्हती, आज नाही, उद्या ही नसणार ..

अबिदा:- ओके जनाब. मग परवा असेल. तर तिचे नाव सांगा ..

धनंजय:- तुम्ही लशीबद्दल विचारताय की माझ्या ब्रह्मचर्याची परीक्षा घेताय?

अबिदा:- हाय अल्ला! तुम तो बुरा मान गए. क्या करे. कामच असले आहे ना.. दारोदारी फिरायचे. दोन दोन शोहरची याद काढत.. त्यामुळे दुनियेत सगळ्यांची शादी करून टाकावीशी वाटते. असू दे. (समीरकडे वळत) हां तर समीर तुमचे नाव?

धनंजय:- तुम्हाला याचे नाव कसे ठाऊक?

समीर:- मस्ट बी वाइल्ड गेस दादा ..

अबिदा:- गेस कसला.. तुमच्या दादानी किती प्रेमाने नावाने बोलावलेले.. समीर..

धनंजय:- मी? कधी?

अबिदा:- ते जाऊ देत.. तुमचे नाव. वय? बायका मुलांची नावं..

समीर:- बायका? तुम्हाला इकडे अब्बासशेठचा जनानखाना दिसतो की काय? आणि लग्न व्हायचे अजून ..

अबिदा:- कधी होणारे?

धनंजय:- ओ अबिदाताई. मलेरियाचा याच्या लग्नाशी काय संबंध?

अबिदा:- आहे.. हमने कहां तो पढा था की अपनी मानसिक अवस्था का संबंध अपने शरीरसे, मनमस्तिष्कसे होता है. लग्न झाल्यावाचून यांची मानसिक अवस्था कशी सुधारणार? मग डास चावला की मलेरिया!

धनंजय:- हे कुठले लॉजिक ताई? मनाचा, लग्नाचा नि मलेरियाचा काय संबंध?

समीर:- आहे, आहे दादा. फास्ट फूड सारखे फास्ट सायन्स! लग्न न झालेल्यांना मलेरिया जास्त होतो.. असा अभ्यास झाला आहे प्रसिद्ध!

धनंजय:- कोणी केला?

समीर:- आम्हीच केला समज. हो की नाही अबिदा बाई?

धनंजय:- वा! एकदा तरी नाव नीट घेतलेस..

समीर:- मला वाटते ना दादा एकदा तरी तू लग्न करून पहाच!

धनंजय:- एकदा तरी? मग बाकी लोक किती वेळा करतात?

समीर:- समोर जीतेजागते उदाहरण आहे.. अबिदाबाई..

अबिदाबाई:- हाय अल्ला. माझं कसलं उदाहरण देताय. लवकरच माझी तिसरी शादी होईल ..

धनंजय:- तिसरी?

अबिदा:- हां. है लडका किसी कॉलेजमें. पढ रहा है.

समीर:- बघ, काही आदर्श ठेव समोर. या बिचाऱ्या अबला पतिता नारी असून तिसऱ्या शादीची तयारी करतात. आणि तू? पहिलीही करू नयेस?

धनंजय:- कुठून कुठे विषय? ओ बाई.. मलेरियाची माहिती घ्या नि निघा. तुमच्या शाद्या आणि बरबाद्यांत आम्हांला इंटरेस्ट नाही.

समीर:- पण मला असेल तर?

धनंजय:- तुला? तू तर त्यांना ओळखत ही नाहीस..

समीर:- म्हणून काय झाले.. एक अबला पतिता नारी आपल्या घरी आली तिची कहाणी ऐकून तिला सहानुभूतीचे दोन शब्द ऐकवू नयेत? काहीच नाहीतर नुसते ऐकून ही घेऊ नये? किती अप्पलपोटेपणा दादा! आणि दुसरे काही नाही तर तू आपली ती बजरंग गुरुजींची शपथ तरी मोडू नये? तू असाच राहशील तर मेरा क्या होगा? मन्नू? हो की नाही अबिदाबाई?

अबिदा:- हे पहा तुमच्या घरेलू मामल्यात घसेटू नका मला. हम अपने नए शौहरके साथ खुश रहेंगे..

समीर:- (हळूच) अगले तलाक तक..

अबिदा:- तो धनंजय भय्या जरा अपना आय कार्ड तो दिखाना ..

धनंजय:- लाता हूं..

*आत निघून जातो. अबिदा आपल्या चेहऱ्यावरून नकाब हटवते ..*

*सायली:- काय रे तुझा हा भाऊ समीर?*

समीर:- बघितलंस ना. हनुमानाचा शिष्य! बजरंग गुरुजींनी डोकं फिरवलंय.. जोवर हा लग्नास तयार होत नाही तोवर आपला नंबर नाही.. काही खरं नाही बघ. घरचे सगळे आता बाहेर गेलेत.. रत्नाग्रीला.

सायली:- कशाला?

समीर:- उस्मान साठेंकडे! बोलणी करायला ..

सायली:- उगाच नेहमीसारखी बडबड नकोय .. धनंजय येईल बाहेर

समीर:- छे गं. तो कसला येतोय इतक्यात! मी ते आयकार्ड त्या कप्प्याच्या तळाशी ठेवलंय. तो शोधताना थकेल. आणि दादाची एक गोष्ट मानली पाहिजे.. जोवर हाती आय कार्ड येत नाही तोवर तो बाहेर येणार नाही. हाती घेतलेले काम तडीस नेल्याशिवाय सोडत नाही तो. तर तोवर आपल्याला मोकळे रान! पण तू मलेरिया कुठून आणलास मध्ये?

सायली:- अरे गडबडले मी. टेन्शन आले. जे सुचले ऐनवेळी ते बोलून टाकले..

समीर:- बुरख्याचा असाही फायदा! त्यामुळे चेहऱ्यावरचे भाव दिसत नाहीत!

सायली:- हुं.. पण मला या बुरख्यात किती उकडते याचा काही विचार? आणि काहीतरी बोलून बोलून तोंड दुखले माझे ..

समीर:- ओह! त्यावर जालीम उपाय आहे माझ्याकडे ..

सायली:- उगाच मियाला दिली ओसरी आणि मिया हातपाय पसरी असे करू नकोस.

समीर:- मिया! अबिदा बेगम तुला प्रॉब्लेम तरी काय? दोन शाद्या आधीच झाल्यात.. तिसरी होऊ घालतेय. आणि काय गं.. आपले अख्तरी ठरलेले नाव.. तू अबिदा म्हणालीस..

सायली:- काय करू? टेन्शन मध्ये तोंडातून निघून गेले.. अख्तरी काय नि अबिदा काय.. पण तू कशाला वेगवेगळी नावं घेत राहिलास?

समीर:- गंमत गं..

सायली:- पण माझी त्रेधा उडाली त्याचे काय? एकतर असे वेशांतर करून बोलावलेस घरी..

(आतून) धनंजय:- अरे कुठेय आय कार्ड? बिचाऱ्या अबिदाताईंना परत यावे लागेल.

समीर:- (हळूच) वा! छान आयडिया! (मोठयाने) अरे, तिथेच आहे. ड्रॉवरच्या खालच्या ड्रॉवरमध्ये!

सायली:- ड्रॉवरचा खालचा ड्रॉवर? म्हणजे काय तुला तरी कळले काय?

समीर:- हे कळो न कळो .. दादा काय चीज आहे ती कळली ना? याला बोहल्यावर कोण चढवणार.. तोवर आपले ही भिजत घोंगडे.

*नकाब चेहऱ्यावर टाकून अबिदा रडायला लागते..*

धनंजय:- काय झालं रे? ती अबला पतिता का रडतेय तिकडे?

समीर:- काही नाही. तिला शमसुद्दीन आणि अब्बासची आठवण येतेय.. उगी उगी सायली.. अबिदा .. रडू नकोस. आपण अब्बासशेठला अब बास बोलून जीभ दाखवून येऊ.. म्हणजे तुमच्या मनातील कोंडलेल्या भावभावनांचा निचरा होईल..

अबिदा:- आपका क्या साहेब. आप बडे लोग. जब चाहे निकाह कर सकते हैं!

समीर:- नाही ना बये! तिथेच घोडं पेंड खातंय..

*अबिदा नकाब वर करते.. इतक्यात धनंजय बाहेर येतो. ओझरता बघतो. ती नकाब लगेच खाली पाडते..*

धनंजय:- वाटतंय तुम्हाला कुठे तरी पाहिलेय मी.. कॉलेजात?

अबिदा:- हाय अल्ला. बडे बेशर्म हैं आपके भाई.. अंदर मच्छर आया उसे उडाने पर्दा क्या हटाया.. आपने नजर डाल ही ली.. क्या होगा आपके ब्रह्मचर्य का? मुझे नहीं चाहिए आय कार्ड.. बाय कार्ड.. ऐसे बदतमीज लोगोंके घरमें और एक पल नहीं रूकूंगी मैं. समीर, तुम्हारे इस ब्रह्मचारी भाई से यह उम्मीद नहीं थी. माझं ऐकाल तर लवकर शादी उरकून टाका.. यांची.

समीर:- तुमचा गैरसमज होतोय अबिदाजी..

अबिदा:- बिलकुल नहीं. मैं चली..

*तरातरा निघून जाते.*

धनंजय:- तुला नाही वाटत हिला कुठे तरी पाहिलंय?

समीर:- मला काय ठाऊक दादा? माझी नजर परस्त्रीकडे कधीच नसते.. पण तू कशाला तिला बघायला गेलास?

# प्रवेश ३

समीरचेच घर. धनंजय आणि समीर दोघे बसलेत. धनंजय उठून सूर्यनमस्कार घालू लागतो. समीर बाजूला बसून मोजू लागतो.. एक.. एकशे दोन.. दोनशे तीन.. तीनशे चार.. चारशे पाच..

धनंजय चिडून थांबतो..

धनंजय:- उगाच डिस्टर्ब करतोयस.. समर्थाचिया सेवका डिस्टर्बाहे .. असा सर्व भूमंडळी कोण आहे..

समीर:- वा! पण झालासच ना डिस्टर्ब .. थोडक्यात असा सर्व भूमंडळी मीच आहे.. मारूतीराया.. या अर्जुनास क्षमा कर.. धनंजय अर्जुनाचे एक नाव आहे.. तुला ठाऊक नसेल तर सांगतो.. तर हा तसा महाभारतातला कॅरॅक्टर आहे पण रामयणातल्या हनुमंता .. त्यास माफ कर..

धनंजय:- चूप रे.. निरर्थक बडबड बंद कर.. मी खरंच सांगतो.. ही सवय सोड.. नाहीतर तुझी जी कोणी बायको होईल ना ती तुझी बडबड ऐकून दोन दिवसांत पळून जाईल..

समीर:- वाह रे! जसा काही अनुभवच आहे तुला..

धनंजय:- अर्थात .. नाही. पण सह अनुभूती काही प्रकार असतो की नाही? तर मोठया भावाचे ऐक. बाष्कळ बडबड वर्तमानात बंद कर. तरच तुझा भविष्यकाळ सुखाचा होईल..

समीर:- होय स्वामीजी ..

धनंजय:- मग काय.. मलेरियाची लस घेतलीस का टोचून?

समीर:- मी? त्या दिवशी त्या बिचारीला पळवून लावलेस तू.. झेपत नाही तर कशाला घ्यावी शपथ नि बिपथ? अग्निपथ.. अग्निपथ..

धनंजय:- चूप.. बरं ते सोड.. बिलं भरलीस की नाहीत? अप्पा सांगून गेलेत..

समीर:- तुला ..

धनंजय:- मला नाही तुला ..

समीर:- पण घरातील मोठा सध्या तू. कर्ता पुरूष तू.उत्तराधिकारी तू..

धनंजय:- बिलं भरलीस का?

समीर:- नाही.. असली कामं ब्रह्मचाऱ्यांनी करावी. माझ्यासारख्यास कशाला हे सगळे व्याप? तुला काय न कोणी बायका न मुलं.. न कोणी ..

धनंजय:- आणि तुला?

समीर:- हमारी सभी लाईनें व्यस्त हैं.. हमारे हर संभव प्रयास जारी हैं.. रूकावट के लिए खेद है.. शीघ्रही उत्तर की अपेक्षा है..

धनंजय:- कोणाकडून? कोणी शोधलीस की काय?

समीर:- काय उपयोग? आणि तुला सांगून तर नाहीच.. जोवर तू बोहल्यावर नाही तोवर माझा कसला चान्स ..

धनंजय:- कोण रे.. सांग ना..

समीर:- तुला कशाला नसत्या उठाठेवी? बाबा रे, तुझं जग निराळं.. माझं जग निराळं..

धनंजय:- राहिले .. सखाराम गटणेबुवा..

समीर:- राँग.. नॉट गटणे .. नाथा कामत.

धनंजय:- ठिकै.. पण नाव तर सांग.. की लाजतोयस?

समीर:- छे.. लाजायचे काय? हम नहीं करते ऐसे करम.. जिसकी की आए हमको शरम.. कळलं?

धनंजय:- तर मग नाव घ्यायला किंवा सांगायला काय हरकत?

समीर:- ओ के.. एका अटीवर..

धनंजय:- कसली अट?

समीर:- काही नाही रे.. जस्ट एका ज्योतिषाला बोलावलेय घरी .. येईल थोड्या वेळात. त्याला हात दाखवायचा..

धनंजय:- कोणाचा?

समीर:- कोणाचा काय? तुझा नि माझा..

धनंजय:- कशाला?

समीर:- कशाला काय? फ्युचर इज सो ब्लीक .. बघू ज्योतिषी तरी होतो का क्लिक ..

धनंजय:- तू? कोणाला घरी बोलावलेयस? कधी?

समीर:- आता.. ज्योतिषाचार्य ज्योतिर्भास्कर श्री. श्रीराम गोळवलकर..

धनंजय:- श्रीराम गोळवळकर? कधी नाव ऐकण्यात नाही..

समीर:- हुं. जसं काय सगळ्या ज्योतिषी लोकांचा हूज हू वाचतोस तू दररोज ..

धनंजय:- पण हात तुझा दाखव.. मी कशाला?

समीर:- कारण आपली भविष्ये एकमेकात अडकलीत रे.. एन्टँगल्ड! तू हात दाखव.. माझ्या भावी वहिनीबद्दल काही माहिती मिळते का पाहतो.. नि मी तुझ्या भावी वहिनीचे नाव सांगतो..

धनंजय:- भावी वहिन्या! ठीक आहे.. मंजूर .. हात दाखवून अवलक्षण होणार नाही एवढे मात्र बघ बाबा समीरा ..

समीर:- यू आर सच अ गुड सोल धनंजय दादा.. आय टेल्यू तू फक्त 'हो' म्हण ..

धनंजय:- उगाच फाटे नको फोडूस.. नाव सांग.

समीर:- अरे तीच.. तीच ती

धनंजय:- तीच?

समीर:- हो!

धनंजय:- म्हणजे? तिचं बारसं पण लग्नाच्या वेळीच की काय?

समीर:- तीच..

धनंजय:- म्हणजे तीच?

समीर:- होय.. तीच!

धनंजय:- म्हणजे अबिदा? त्या दिवशीची अबला पतिता.. तू तिचा उद्धारबिद्धार ..

समीर:- काय दादा .. कायतरी बोलतोस. ती कोण कुठची मला काय ठाऊक .. ही वायली, म्हणजे हिचे नाव सायली ..

धनंजय:- सायली?

समीर:- सायली.. माय लव्ह .. सायली.. आय ड्रीम ऑफ यू..

धनंजय:- सायली?

समीर:- काय झालं दादा? दोन वेळा 'सायली?' विचारतोयस?

धनंजय:- काही नाही. कधी यायचेत.. ज्योतिषाचार्य?

समीर:- एनी टाइम दादा.. एनी टाइम नाऊ..

*समीर फोन घेऊन बोलायला लागतो..*

समीर:- मी समीर सावंत .. गुरुजी, कधी पोहोचताय? पोहोचवून येताय? कुणाला? जवळच आहात? या.. वाट बघतोय.. वाट लावतोय नाही .. बघतोय गुरुजी. लवकर या.. लव कर.. क्रियाविशेषण नाही .. क्रियापद .. हो.. लव कर..

धनंजय(हळूच):- सायली? नि ह्याच्याबरोबर? (मोठयाने) हे काय मराठी व्याकरण बिकरण शिकवतात की काय गोळवळकर गुरुजी?

समीर:- कुणास ठाऊक. मोठया माणसांचं थोडं तंत्र विचिंत्र असतं दादा..

*दरवाजावर टक टक होते.. समीर जाऊन दरवाजा उघडतो.. ज्योतिषी आणि तो आत येतात. ज्योतिषी तरूण वाटत असले तरी दाढी पांढरी*

*आहे. डोक्यावर टोपी खेळताना वापरतात तशी. हातात भिंग घेऊन आत शिरतात..*

समीर:- दादा.. हे ज्योतिर्भास्कर

ज्योतिषी:- श्रीरंग तोंडवळकर..

धनंजय:- समीर, पण तू श्रीराम गोळवलकर म्हणालेलास..

समीर:- नाही रे.. (हळूच) ही सायली ठरवलेले बदलून नवी स्क्रिप्ट कशाला लिहितेय?.. श्रीरंग.. तोंडगोडकर

श्रीरंग:- नो.. नो.. नावाची तोडफोड करणाऱ्यास ईश्वरचरणी शांती मिळणार नाही. मी तोंडगोडकर नाही ..

समीर:- तेच.. गोळवळवर..

श्रीरंग:- नाही.. हस्त सामुद्रिक.. तोंडवळकर..  तर आम्ही सगळ्या अपॉइंटमेंट्स सोडून आलोय.. हस्तपरिक्षा.. नाडी परीक्षा .. चेहऱ्यावरून परीक्षा

.. झालंच तर अस्थिपरीक्षा..

धनंजय:- अस्थिपरीक्षा? हे कधी ऐकले नाही..

समीर:- ज्योतिषी कोण आहे? तू की ही?

धनंजय:- ही? पण ही इज नॉट 'ही'.. ही इज बुवा नॉट बाई..

समीर:- तेच.. इंग्रजी ही.. ही ऑर यू? हू इज द ज्योतिषी? आणि ही इज शीघ्रकोपी.. अरे महिनो न महिने गुरूजींची अपॉइंटमेंट मिळत नाही. मी स्पेशल ओळख काढली तेव्हा गुरुजी तयार झाले. तेव्हा नसत्या शंका नकोत..

श्रीरंग:- नाही.. मि. समीर सावंत. प्रश्न विचारणे गरजेचे आहे. त्यावाचून प्रगती नाही. फक्त ते कोणाला विचारावे याचे भान हवे.. अस्थिपरीक्षा ही आम्ही डेव्हलप केलेली पद्धती आहे.. तोंडवळकर्स बोन एक्झामिनेशन मेथड.. इंटरनॅशनली फेमस! त्यात आम्ही एखादे हाड तोडून बघतो.. हाताचे वा पायाचे. कॉम्प्लिकेटेड असेल तर कवटीचेही..

धनंजय:- बाप रे! अघोरी एकदम!

श्रीरंग(उठत):- मि. सावंत, आम्ही चाललो. आमच्या आंतर्राष्ट्रीय पद्धतीस अघोरी म्हणणाऱ्याचे भविष्य अंध:-कारमय असणार .. आम्ही नि:-शाप सप्ताह पाळीत आहोत म्हणून .. नाहीतर ..

समीर:- क्षमा असावी गुरुजी. दादा लहान आहे. बिचाऱ्यास समज कमी..

श्रीरंग:- लहान? आम्हाला तर वाटते दोन पोरं असणार त्यास.. नि:-शाप सप्ताहात आम्ही शाप देत नाही .. म्हणून बचावला

नाहीतर .. कबुतर बनून खिडकीत बसला असता.. गुटर्गु प्रियाराधन करीत!

धनंजय:- क्षमा गुरुजी .. प्रियाराधन? मी आजन्म आमरण आसेतुहिमाचल ब्रह्मचारी. असला कठोर शाप नको.. पण अस्थिपरीक्षा..

श्रीरंग:- सावंत, मी हा चाललो.. कोणा मर्दाकडून होणाऱ्या आमच्या उपमर्दासही काही मर्यादा आहेत..

समीर:- हातरूमाल पसरून क्षमायाचना करतो.. आपण असे कोपू नये गुरुजी. धनंजय, नो डाऊट्स.. गुरुजी सांगतील ते निमूट ऐकावे..

श्रीरंग:- ठीक. एकवेळ देवसुद्धा क्षमा करतो.. तर आम्हीही करू.. चला आम्ही अत्यंत बिझी आहोत.. लवकर आपापले चेहरे दाखवा..

धनंजय:- ते तर तुमच्या समोरच आहेत.. म्हणजे त्या अबिदासारखा बुरखा थोडीच घातलाय..

श्रीरंग(रागाने पाहात):- हात दाखवा..

*धनंजय आणि समीर हात पुढे करतात.*

श्रीरंग:- एकावेळी एकच.. तुमच्यापैकी वयाने मोठे कोण?

धनंजय:- कोण वाटते?

श्रीरंग:- प्रश्न फक्त ज्योतिर्भास्कर श्रीरंग गोळवळकर विचारणार..

धनंजय:- तुम्ही गोळवळवर? की तोंडवळकर?

श्रीरंग:- आता आम्ही फायनल कोपणार.. तोंडवळकर.. उगाच तोंड वर करून विचारू नका.. हात पाहू.. वयाने मोठयाचा प्रथम ..

*धनंजय हात पुढे करतो. श्रीरंगची दाढी थोडीशी सैल झाल्यासारखी होते..*

श्रीरंग:- थांबा. आधी प्रार्थना ..

धनंजय:- मारूती स्तोत्र म्हणू?

श्रीरंग:- तुम्ही नाही.. आम्ही करणार.. तुम्ही फक्त डोळे मिटा ..

*दोघे डोळे मिटतात.. समीर हळूच डोळा उघडून पाहतो. श्रीरंग हलक्या हाताने दाढी नीट चिटकवतो.. समीर हळूच डोळा मारतो..*

श्रीरंग:- उघडा डोळे. शुभकार्यापूर्वी ईशप्रार्थना महत्त्वाची. थोरामोठ्यांनी सांगितलेय.. म्हणून तर ते थोर आणि मोठे झाले.. धनंजय सावंत .. हात बघू..

*धनंजय डावा हात पुढे करतो. श्रीरंग भिंग घेऊन..*

श्रीरंग:-(स्वत:शीच बोलल्यासारखे) स्ट्रेंज.. यू शुडन्ट बी अलाइव्ह.. ही आयुष्यरेषा संपून कितीतरी वर्षे उलटली.. काहीतरी गडबड आहे.. आहे उपाय आहे.. पण नाही .. हुं.. डावा हात कशाला.. तरीच म्हटले.. (रागाने) तो उजवा हात करा पुढे ..

*धनंजय उजवा हात पुढे करतो.*

श्रीरंग:- (स्वत:-शी बोलल्यासारखे) हां.. आता ठीक आहे. गुरूचा उंचवटा.. ही रेषा अजून थोडी लांब असती तर.. हा शुक्र.. सातव्या घरात शनि.. नेपच्यून .. अमंगळ मंगळ.. लग्नघरात टंगळमंगळ.. सूर्यक्षेत्री तेज.. हर्षल आणेल हर्ष पण राहू आणि केतू टपून बसलेत .. नाहीतर उगवली असती.. शुक्राची चांदणी.. (मोठ्याने) ब आणि स.. बस!

धनंजय:- म्हणजे?

श्रीरंग:- सांगतो.. आकडेमोड करावी लागेल. थोडा विचार .. डोके खाजवावे लागेल पण टोपी घालून डोके खाजवणार कसे?

धनंजय:- काही म्हणा गुरुजी .. स्पोर्टस् ची कॅप घातलेला ज्योतिषी पहिल्यांदाच पाहतोय..

श्रीरंग:- (आधीच्या अबिदाच्या टोन मध्ये) आम्हाला असली मजाक पसंद नहीं.. (एकाएकी सावरत) टोपीपेक्षा त्याच्या

आतील भाग जास्त महत्वाचा बालका.. आम्ही दाढीवरून हात फिरवून ही विचार करू शकतो. हे केस उगाच पांढरे नाही झालेत..

*दाढीवरून हात फिरवता फिरवता ती निसटू लागते..*

श्रीरंग:- चेहरा पाहू.. डोळे मिटून..

*धनंजय डोळे बंद करतो..*

श्रीरंग:- आम्ही सांगेतो उघडू नका. (दाढीवरून हात फिरवत नीट बसवत..समीरकडे पाहात) कठीण आहे.. हे सारे कठीण आहे.. नीट बसवावे लागेल.

धनंजय:- काय?

श्रीरंग:- तुम्ही डोळे बंद ठेवा. आम्ही आमच्या गणितात सारे नीट बसवतो. चेहरा वाचत आहोत.. ठोकताळे ठोकून नीट बसवावे लागतील .. घट्ट बंद करा डोळे.. (समीर उठून दाढी व्यवस्थित चिटकवू लागतो..) घट्ट.. छान.. ठोक.. ताळे.. ठोक.. हळू..

धनंजय:-- काय हळू?

श्रीरंग:-- तुमच्या ग्रहांची हालचाल .. हळू.. (समीर तिच्या गळयात हात घालून उभा राहतो.. आवाज न करता त्याला दूर ढकलत..) दूर.. दूर.. ग्रहांची सावली पडणार नाही .. (समीर

बाजूला झाल्या झाल्या..) आता उघडा डोळे.. (समीरकडे रागाने पाहात) आणि आम्ही सांगितल्याशिवाय पापण्यापण लवू देऊ नका.. छान.. आता आमचा अभ्यास संपला ..

धनंजय:- मग मी जाऊ?

समीर:- गुरुजी .. दादाला जाऊ देत.. मग तुम्ही आपले भविष्य निवांत बघत बसा..

धनंजय:- आपले? म्हणजे?

समीर:- तू आपले काम कर.. यात असतो ना तसा आपले.. व्याकरणाचा कीस पाडतो नुसता..

श्रीरंग:- तुम्ही थांबाच.. कारण दोन्ही जणांच्या भविष्याचा कार्यकारण भाव आम्हांला जोडावा लागेल.. त्यासाठी तुमचे असणे जरूरी आहे.. अन्यथा तुमच्या धाकट्या बंधूंचा काही नेम..

धनंजय:- म्हणजे?

समीर:- धाकट्या बंधूंचे नेम.. म्हणजे नाव.. समीर सावंत ..

धनंजय:- ते सांगितलं होतं..

समीर:- विसरले असतील गुरूजी..

श्रीरंग:- हुं. विस्मरण कधी कधी मरणाहून वाईट.. पण धनंजय सावंत.. तुम्ही थांबाच. तुमच्या कुंडलीत ब आणि स ही दोन प्रमुख अक्षरे दिसत आहेत. ब वरून राहू केतु स्थानी.. आणि स वरून कोणी मंगळ स्थानी.. मध्ये प्रचंड पर्वत.. म्हणजे अडथळा ..

धनंजय:- कोड्यात बोलू नका गुरुजी. काही समजेल उमजेल असे..

श्रीरंग:- समजेल नि उमजेल.. बालका .. ब नामक खलनायक स नामक कोणास तुला भेटू देत नाही. अन्यथा आता पर्यंत अ ब क ड नामक चार अपत्ये खेळण्याचा योग आहे..

समीर:- अ.. अनंत.. ब.. बबन.. क.. कमलेश.. ड.. ड.. डबा? ड वरून गुरूजी?

श्रीरंग:- नादान युवका.. अबकड केवळ संज्ञा निर्देशापुरत्या आहेत.. भविष्यात चार अपत्यांचा योग आजवर येऊन गेला असताना ब नामक कोणी त्यात आडवा हात घालताना दिसत आहे..

धनंजय:- गुरुजी, एवढेच. झाले? मी जाऊ?

श्रीरंग:- नाही.. अजून नाही .. तुझा हात दाखव (थोडेफार लाजत) धाकले मालक..

धनंजय:- मालक?

श्रीरंग:- ह्या घरचे धाकटे.. ते धाकले मालक.. हात पाहू.. उजवा आणि डावा.. दोन्ही ..

समीर हात दाखवतो. धनंजय बसून बघतोय..

श्रीरंग:- शनिचा उंचवटा.. गुरूचा पर्वत.. ही आयुष्य रेखा.. सूर्य क्षेत्रे .. नक्षत्र नामे.. मध्ये अडथळे .. पण हात चांगला आहे.. कोणासही दाखवाल.. हात दाखवाल.. अतिशय नशीबवान व्यक्ती ..

समीर:- चेहरा वाचन?

श्रीरंग:- फेस रिडिंग? आम्ही तर फेसबुकवर पाहूनही करू शकतो.. डोळे उघडे ठेवून डोळ्यांत डोळे घालून बघा आमच्याकडे..

समीर:- होय गुरूजी..(हळूच) गुरू हो जा शुरू..

दोघे एकमेकांना बघत राहतात..

धनंजय:- गुरूजी, ही पद्धत थोडी वेगळी आहे का? माझे फेस रिडिंग..

श्रीरंग आणि समीर भानावर येतात ..

श्रीरंग:- बालका .. प्रत्येकास वेगळी मेथड.. होराभूषण वेगवेगळ्या पद्धतीने चेहरे वाचू शकतो.. तो वेगळा.. ही वेगळी..

धनंजय:- म्हणजे?

श्रीरंग:- म्हणजे .. चेहरा वेगळा.. पद्धत वेगळी! आम्ही ठरवतो.. पण तुमचे बंधूराज नशीबवान आहेत..

समीर धनंजयसमोरच डोळा मारतो. मग चपापून डोळे चोळू लागतो..

श्रीरंग:- वा! चेहरावाचनाचा प्रभाव..

धनंजय:- पण तुम्ही माझ्याबद्दल सांगितलेच नाहीत गुरुजी ..

श्रीरंग:- सांगतो आम्ही.. पण आधी एक ग्लास पाणी मिळेल का?

धनंजय:- अवश्य.. समीर.. जा!

श्रीरंग:- त्यांना नको.. त्यांचे नयनवाचन बाकी आहे.. कदाचित काही अनवस्था प्रसंग उद्भवला तर अस्थिवाचन ही..

*धनंजय आत जातो. सायली समीरला डोळ्यांनी दटावते. तो काही बोलण्याच्या आत धनंजय आतून पाणी आणून येऊन बसतो..*

धनंजय:- मला वाटतं याची अस्थिपरीक्षाच करावी..

श्रीरंग:- आम्ही ठरवू ते. आम्हाला कोपवू नका.. अति संयमाने आम्ही सारे पार पाडत आहोत.. त्यात हे सारे..

धनंजय:- क्षमा असावी गुरुजी ..

श्रीरंग:- तुमचे बंधूराज रूमाल पसरवून क्षमा मागतात.. तुम्ही? टॉवेल पसरवून?

धनंजय:- नुसतीच क्षमा करावी गुरूजी.

श्रीरंग:- ठीक. आम्ही आता लिनियंट होऊन सारे सांगत आहोत. नीट कान देऊन ऐकावे.

समीर:- होय गुरुजी ..

श्रीरंग:- तर ब आणि स.. धनंजयच्या मार्गात ब नावाची व्यक्ती आहे जी त्याच्या मार्गातील धोंड आहे.. धोंड म्हणजे एखादा पैलवान.. असा काहीतरी ..

समीर:- बजरंग गुरुजी?

धनंजय:- समीर! अर्थातच नाहीत. ते माझे गुरू आहेत. कल्पतरू आहेत. त्यांच्या आदेशावरूनच ह्या आयुष्याच्या मार्गाची क्रमणा करणार मी.. कठोर ब्रह्मचर्य हा आत्मिक उन्नतीचा पाया आहे.. माझे गुरुजी माझा उत्कर्ष होण्यासाठी जिवाचे रान करीत आहेत. त्यांच्या पायाशी घेतलेली शुकासारखे वैराग्य राखण्याची शपथ.. आणि तू खुशाल त्यांना धोंड म्हणतोस.. आपल्या संस्कृतीचा आभिमान.. गुरूर्देवो महेश्वरा .. कुठे रे गेला..

श्रीरंग:- आणि दुसरा स.. स्पष्ट दिसत आहे तो क्षण जेव्हा स वरून नावाची व्यक्ती या घरात प्रवेश करेल..

धनंजय:- सुरेशचंद.. सुतार आहे.. माळा बांधायचाय..

श्रीरंग:- स नावाची व्यक्ती उंबरठ्यावर माप ओलांडून येईल.. ती निघालीय पण ब नामक व्यक्तीच्या प्रभावात तिचा मार्ग रोखून धरला जातोय..

समीर:- स फॉर.. सायली..?

श्रीरंग(आपले बेअरिंग विसरून ओरिजिनल आवाजात):- काय..

धनंजय:- तुमचा आवाज..?

श्रीरंग:- बोलून बोलून फाटतो..

समीर:- आमच्याकडे सुरेश सुतारासारखा एक समरूद्दीन टेलर आहे.. त्याच्याकडे शिवून घ्या..

श्रीरंग:- तर.. सायलीनामक कोणी आहे का?

धनंजय:- छे हो! हा काहीही बोलत असतो. आणि कोणी कशी असू शकते? माझ्या शपथेने मी बांधला गेलो आहे.. आपल्या संस्कृती प्रमाणे.. प्राण जाई पर बचन न जाई..

श्रीरंग:- आम्ही सांगितले जे स्पष्ट दिसत आहे.. आता धाकटे बंधू. आम्ही म्हणालो तसेच अत्यंत नशीबवान आहेत.. कारण त्याच्या लग्नरेषेनुसार अत्यंत सद्गुणी मुलगी यांच्या नशिबात दिसत आहे.. उंची पाच फूट दोन इंच.. वर्ण..

धनंजयचे लक्ष नाही.असे पाहून समीर हळूच चिमटा काढतो तिला मागून ..

श्रीरंग:- पण एक अडचण आणि महद्भाग्याची गोष्ट आहे.. दोन्हींचे उत्तर धनंजय यांच्या कडे.. म्हणजे एकूण चित्र असे की जोवर धनंजय यांच्यावरील ब व्यक्तीचा प्रभाव निघत नाही तोवर स व्यक्ती त्यांच्या आयुष्यात येणार नाही.. तोवर त्यांच्या धाकट्या बंधूंच्याही आयुष्याची कुंठलेली गती वाढणार नाही .. थोडक्यात धाकटे बंधू अत्यंत नशीबवान येथेही दिसत आहेत आम्हास.. त्यांच्यासाठी थोरले बंधू कोणताही त्याग करण्यास तयार असल्याने आपले वचनही ते मोडतील असे कुंडलीतील ग्रह सांगतात .. धनंजय तुम्ही ..

धनंजय:- गुरूजी.. झाले ना.. मग आपण निघावे. तुमची फी ऑनलाईन ट्रान्सफर करेल हा समीर.. आपण निघावेच.. प्राण जाई पण बचन न जाई..

समीर:- प्राण जाईल पण अमिताभ बच्चन न जाई..

धनंजय:- पांचटपणा पुरे.. आणि गुरूजी धन्यवाद.. निघावे.. लगेच. नाहीतर अस्थिपरीक्षा या समीरची करेन मीच..

*श्रीरंग उठून निघून जातो..*

समीर:- काय हे? गुरुजींना काय वाटले असेल?

धनंजय:- हुं.. आय डोण्ट बिलिव्ह इन इट.. ज्योतिर्भास्कर तोंडवलकर म्हणे .. आय डाऊट इफ ही नोज एनिथिंग.. आणि ज्योतिष म्हणजे एक हंबग..

समीर:- आपल्या संस्कृतीचा काही अभिमान? तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती. अरे, अखिल विश्वास फलज्योतिषाची देणगी देणारे आपले भारतवर्ष.. त्यात केवळ स्वतःस पटत नाही म्हणून त्या विज्ञानावर विश्वास न ठेवण्याइतक्या थरास तू जावेस? दादा.. मी कुणाच्या तोंडाकडे पहावे?

धनंजय:- बरं बरं.. जातो मी आता.. पण एक लक्षात ठेव.. माझी प्रतिज्ञा म्हणजे भीष्मप्रतिज्ञा.. शेंडी तुटो की पारंबी.. मी तिला लोंबकळतच राहणार..

समीर:- (हळूच) आणि मला लटकावतच ठेवणार..

धनंजय:- आणि ते स वरून सायली का म्हणालास तू?

समीर:- दादा.. ज्याचे जळते त्यालाच कळते ती प्रेमाची आग.. आगीची धग.. धगीची उब मिळवण्यासाठी सारी धडपड.. येता जाता कार्य करिता तिचाच विचार.. तर का नाही (पाण्याच्या ग्लासकडे बोट दाखवत) जळी..(घराकडे हात फिरवत) स्थळी.. (लाकडाच्या टेबलाकडे बोट दाखवत)

काष्ठी.. आणि (धनंजयकडे बोट दाखवत) पाषाणी मला ती दिसणार?

धनंजय:- मला वेळ नाही वाद घालायला.. निघतो मी.

(हळूच) सायली.. कठीणै..

*धनंजय निघून जातो. समीर इकडे तिकडे फेऱ्या मारता मारता..*

समीर:- काय करावे म्हणजे या धनंजयाला प्रेमाचा अंकुर फुटेल? बजरंग गुरूजी शरीराचे व्यायाम शिकवतात.. मनाचा लवचिकपणा नाही.. कुंडलीतला हा ब.. आणि धनंजयच्यावर लट्टू ती स.. सायली.. यस्स ती ही सायलीच! एक सीनियर एक ज्युनियर.. विचार करा.. एका घरात दोन्ही येतील.. दोन्ही सायलीच! व्हॉट अ कोइन्सिडन्स! पण हे घडावे कसे? सिनियर आली तरच माझ्या सायलीला चान्स. दादाला त्या शपथेतून बाहेर काढावे कसे? बिचारी माझी सायली.. वेषांतर करून आली.. कुठेतरी दगडास पाझर फुटेल आणि त्यातून प्रेमधारा वाहू लागतील म्हणून .. पण हा कोरडा पाषाण.. कोरडाच राहिला..

*जाऊन दरवाजा बंद करून येतो.. फोन लावतो.. स्पीकरवर..*

समीर -हॅलो डियर.. पोहोचलीस?

सायली - हुं..

समीर -काय करतेयस?

सायली -काही नाही .. काढलेली दाढी जपून ठेवयेय..

समीर - काही म्हण.. सायलीउद्दीन तुला शोभून दिसते हां दाढी ती.. सायलीला दाढी असती तर सायलीउद्दीन म्हणाले असते.

सायली- तू चुप रे. एकतर मी थकलेय. त्यात तो तुझा हनुमान भक्त दादा. तो कसला दाद देतोय

समीर - बट यू ॲक्टेड वेल श्रीरंग ऊर्फ श्रीराम. तू ठरवलेले नाव विसरते कशी गं..

सायली - तुला काय बोलायला? असले रोल करायला मी काय कुणी ॲक्ट्रेस आहे?

समीर - यस्स .. तू माझी हिरॉईन..

सायली- काही बोलू नकोस. मला तर काही लक्षण खरे दिसत नाही

समीर - वेट डियर .. दोन वेळा तू शत्रूपक्षावर मात करून घरी आलीस ना ..

सायली:- मूर्खा मला वेश बदलून नाही खरेखुरे यायचेय..

समीर - पण तू ती स्पोर्टस् कॅप का घालून आलेलीस? ज्योतिषी इन स्पोर्टस् कॅप..

सायली - तू हस.. पण दुसऱ्या टोपीत माझे केस लपले असते का? क्कायचॅ कॅ प्लॅनिंग .. पण ऐक कधी भेटतोयस?

समीर - आताच तर गेलीस.. आणि मी गळयात हात घातला तर झटकून दिलके तुकडे तुकडे करके मुस्कुराके निघून गेलीस.

सायली - शहाणाच आहेस. तुझ्या दादाने डोळे उघडले असते तर?

समीर - तर क्या? प्यार किया तो डरना क्या..

सायली - हो ना.. येतेच मी तशीच.. प्यार किया तो डरना क्या.. और दाढी लगाके भटकना क्या..

# प्रवेश ४

तेच घर. टेबलापाशी धनंजय बसलेला आहे. एकाएकी उभा राहून मारूती स्तोत्र म्हणायला लागतो..

**भीमरूपी महारूद्रा वज्र हनुमान मारूती**

**वनारी अंजनी सुता रामदूता प्रभंजना..**

बापरे! धाव रे रामराया म्हणू की काय? अचपळ मन माझे नावरे आवरिता.. काय ते तोंडवळकर गुरुजी येऊन गेले काय.. माझा दृढनिश्चय डळमळीत होतोय की काय? बजरंग गुरुजी माझ्या प्रगतीत अडथळा .. छे! हा विचार ही एक महत्पाप. नाही. पण कितीही स्तोत्रं म्हटली तरी विचार काही मनातून जात नाही .. विचार .. खरंतर हनुमान भक्ताने निडरपणे प्रश्नास भिडावयास हवे.. दोन दिवसांपासून छळणारे प्रश्न .. बजरंग गुरुजी हा प्रश्न .. नाही. मग? प्रश्न खरा तो सायलीचा! सायली! समीर म्हणतोय सायली त्याची.. कसे शक्य आहे? कमीत कमी वर्षभराने मोठी त्याच्याहून.. ती माझ्या आगेमागे असते जणू एखाद्या उपग्रहाने

घिरट्या माराव्यात.. पण वो बेवफा.. मेरे भाई की सहेली बन गई? खरं सांग.. इज दॅट नॉट डिस्टर्बिंग यू मि.धनंजय? जोवर ती आजूबाजूस माझ्यासाठी रिझर्व्ह आहे तोवर तिच्याकडे पाठ फिरवून दुर्लक्ष .. तिनेच मग दुसरीकडे.. पण प्रत्यक्ष माझ्याच लहान भावाकडे.. जी व्हावी अर्धांगी.. ती बनेल वहिनी? पण त्याने काय फरक पडावा? शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे.. आवर रे मना हा सारा विचारांचा पसारा.. नच घाल विचारा चारा.. परत व्यायामाकडे लक्ष द्यावे. मन गुंतवावे ..

**महाबळी प्राणदाता सकळा उठवी बळे**

**सौख्यकारी दुःख हारी धूर्त वैष्णव गायका ..**

*धनंजयचा मित्र कैवल्य आत येतो..*

कैवल्य:- येऊ का आत..

*धनंजय स्तोत्र तोंडातल्या तोंडात म्हणत त्याला बसायचा इशारा करतो. कैवल्य आजूबाजूला बघत बसून राहतो. थोड्या वेळाने मारूती स्तोत्र संपवून मारूतीस वंदन करून धनंजय येऊन खुर्चीवर बसतो..*

धनंजय:- आत आल्यावर आत येऊ का म्हणायची कुठली पद्धत? आता आलाच आहेस तर बस. बोल काय काम?

कैवल्य:- काम? एका मित्राने दुसऱ्या मित्राकडे कामा शिवाय जाऊच नये?

धनंजय:- तसं नाही. पण तुझे नि माझे विचार पटत नाहीत. अजिबात. तू कॉलेजात ताटवे बघत फिरणारा. मी परमभक्त हनुमानाचा. ब्रह्मचर्य कडक. मी मलाच शब्द दिलाय?

कैवल्य:- कधी?

धनंजय:- कधी? कधी काय विचारतोस? मुलाचे पाय पाळण्यात दिसतात .. तेव्हा पाळण्यात असल्यापासून घेतलीय ती शपथ! ते आद्य कर्तव्य आहे.

कैवल्य:- हात्तिच्या, म्हणजे पंधरा महिन्याचा असताना शेजारची ती गोडुली आलेली.. तिला पाहून तू रडलेलास.. ती सव्वा महिन्याची.. तू सव्वावर्षाचा. पण तरीही तिला पाहून तू पसरलेस ते भोकाड.. तो याच शपथेचा पहिला आविष्कार होता म्हण की!

धनंजय:- कर्तव्यपालनाच्या रस्त्यावर तुझ्यासारखे यःकश्चित अडथळे येणारच. ते ओलांडून पुढे जाणे हाच एक माझा मार्ग एकला. ध्येयप्राप्तीच्या रस्त्यात काटेकुटे असायचेच. गुरुजींनी मला सांगितले आहे बजावून. ते पाळणे हे माझे आद्य आणि

परम कर्तव्य आहे! आजवर जी जान की बाजी लावून मी ते निभावले आहे.. त्यापुढे त्या गोडुली म्हणवणाऱ्या सायलीचा काय पाड? ती अजून येते बरं.. मी तिच्याकडे दुर्लक्ष करतो. तशी चांगली आहे ती..

कैवल्य:- पिघल रहा पहाड .. तशी म्हणजे कशी?

धनंजय:- तशी म्हणजे एक व्यक्ती म्हणून. प्रत्येक मुलामुलीस स्वतंत्र अस्तित्व असते की नाही एक व्यक्ती म्हणून? त्यात त्याचे अथवा तिचे मूलत्व वा मुलगीत्व आड येत नाही. येऊ नये. गुरुजी सांगतात हे. आपल्या कॉलेजात किती मुली होत्या?

कैवल्य:- तेच तर.. एकही मला पटू नये?

धनंजय:- तेच काय? मी सांगतो काय.. तू बोलतोस काय? कॉलेजात मुलींच्या दलदलीच्या चिखलात मी एक डौलाने उभा अलिप्त कमळासारखा .. माझ्या मनास स्पर्श करून न जाणारे तारूण्यसुलभ विचार हेच माझे व्यवच्छेदक लक्षण.. असे बजरंग गुरुजी म्हणतात.

कैवल्य:- मुलींचा चिखल आणि दलदल? ही कसली रे उपमा?

धनंजय:- माझा नव्हे. बजरंग गुरुजींचा शब्द आहे तो. किती फरक रे तुझ्यात आणि गुरूजींत. तू गुरूजींचा दहा वर्षांनी तरूण जुळा

भाऊ वाटतोस.. दिसतोस.. पण असण्यात? गुरूजी एक ध्रुव तर तू दुसरा.. तर गुरूजी म्हणतात त्या चिखलातला मी राजीव..

कैवल्य:- असशील तू.. राजीव .. सजीव.. चिरंजीव.. हनुमानाचा चिरंजीव भक्त.. मी निघतो नाहीतर आपणासारखा करशील तत्काळ .. तर काही खरे नाही. चिखलातच मी बरा.. नाही मी चिखलातच बरा..

धनंजय:- या दुनियेच्या कर्दमात लोळतो कोण? वराह! म्हणजे सोफेस्टिकेटेड भाषेतला डुक्कर!

कैवल्य:- रोज बाय एनी नेम इज रोज. तसा डुक्कर बाय एनी नेम इज डुक्कर! आणि डुक्कर तर डुक्कर.. मला वाटते जातो मी. माझा मेंदूच धुवून काढशील नाहीतर तू.. आता कुठे त्या सायलीशी बोलचाल होतेय..

धनंजय:- सायली? कोण सायली?

कैवल्य:- तुला कसला फरक पडतोय? कुणी का असेना. ज्या गावी जायचेच नाही त्याचा पत्ता का विचारावा? कुणीका असेना. तुझीवाली सायली पण असू शकते.. त्याने काय फरक पडणारे माय डिअर मारूती भक्त..

धनंजय:- ते ही खरंच. एकतर ती माझीवाली नाहीच.. पण एक जनरल क्युरिऑसिटी.. आणि काही नाही..

कैवल्य:- चुकतोस इथे तू.. चुकतोयस! उगाच असे करशील तर शांतीस मुकशील. ही मन:-शांती. शांती अल्मेडा नव्हे. नाही तर परत क्युरिऑसिटी जागृत व्हायची तुझी. तर आता कुठे माझे सायलीशी काही जुळू पाहत असताना तू असा रास्ता रोको करावास? मनातील विचारांना आवर घाल बालका. नाहीतर बजरंग गुरुजींचा सोटा पडायचा पाठीत. आणि तसा तू आम्हाला कित्ती कित्ती हवा आहेस म्हणून सांगू? मी म्हणतोय हे. सायली नव्हे. इतके ध्यानात ठेव.

*इतक्यात सावित्री आत येते. ती स्वयंपाकीण. साधारण पस्तीशीतली असावी. कैवल्यला पाहून दचकते..*

सावित्री(आतून):- साहेब, काय बनवायला सांगितलेय बाईंनी? जाताना सांगून गेलेल्या मला पण उगाच काही प्लॅन बिन बदलला असेल तर? आणि तुमचे मित्र जेवायला थांबताहेत की नाही. मला वाटलं गुरूजीच बसलेत की काय! अगदी त्यांच्यासारखे वाटतात. एकदा माझ्या हातची अळूची भाजी खाऊन बघा म्हणावं..

धनंजय:- कशाला खायला घालू याला. माझ्यावरच उलटेल एखादवेळी ..

कैवल्य:- तब तो जरूर खाकर जाएंगे.. बनवा माझ्या साठी पण. बघूया हळूहळू खाऊन अळू.

धनंजय:- हे चांगलेय.. मान न मान.. मैं तेरा मेहमान? अरे, बजरंग गुरुजी पण खाल्ल्याशिवाय जात नाहीत. सावित्रीबाई जेवणच बनवतात तसे..

सावित्री (हातात भांडं घेऊन बाहेर येऊन):- साहेब, गुरुजी कधी यायचेत.. काल भेटले होते रस्त्यात. सायकलीवर चाललेले व्यायाम शाळेत. काल रस्सा होता केलेला घरी. म्हटले जाताना घेऊन जा थोडा. माझ्या घरावरूनच जातात ना.. तर जाताना थांबले.. डब्यात भरुन घेऊन गेले..

धनंजय:- गुरूजींना आवडत असणार ..

सावित्री:- तर हो. मला वाटतं गुरूजी एकटे. बाईमाणसाच्या हातची चव.. स्वतःच्या हातचं खाऊन कंटाळले असणार. म्हटलं मी.. देईन रोज करून..

धनंजय:- किती ठिकाणी काम करता तुम्ही?

सावित्री:- कामं कसली? अहो पोरांचे क्लासेस चालवते. तुमची आई ओळखते चांगली म्हणून तुमच्या घरी येते..

धनंजय:- मिस्टर काय करतात?

सावित्री:- ते गेले. अपघातात. मी एकटीच. मग शाळेतल्या पोरांचे क्लासेस चालवते. कुणाला हवं असेल तर जेवण बनवते.. जेवण बनवायची हौस खूप पण खायला कोणी पाहिजे की नाही? जेवण बनवलेले कुणी खाताना पाहिले की माझं पोट भरते.. तुम्ही बसा.. मी आलेच..

*सावित्री आत निघून जाते.*

धनंजय(हळूच):- गुरूजींना जेवण.. एकटे गुरूजी .. हृदयाचा मार्ग पोटातून?

कैवल्य:- काय तोंडातल्या तोंडात बोलतोयस? बोल की मोठ्याने.

धनंजय:- काही नाही. तू बस.. खाऊन जा भाजी अळूची..

कैवल्य:- टेल्यू द फॅक्ट.. अळूची भाजी तिला पण फार आवडते..

धनंजय:- तिला? म्हणजे कोणाला?

कैवल्य:- तीच.. हृदयवासिनी.. देवी. सायली.. डब्यातल्या एका कप्प्यात घालून घेऊन गेलो तर तिच्या हृदयाच्या कप्प्यात जागा देईल मला ती?

धनंजय(एकाएकी चिडल्यासारखा):- डब्यात वगैरे घालून घेऊन जाऊ नकोस. तुला हवे तर खा इथे.. आयजीच्या जिवावर .. इंप्रेशन पाडायला निघायलेत.. दुसरे काही उद्योग नाहीत. तरूण पिढीसमोर असले आदर्श? देशाला गरज आहे ती..

कैवल्य:- ओके बाबा.. मीच फक्त इथे तुझ्या समोर खातो.. मग तर झालं. तशी सायली समजूतदार आहे. बहुतेक तर 'समझो हो ही गया' स्टेज ला आहे..थोड्याच महिन्यात पुढचे पाऊल पडेल. मला वाटतं ती या सावित्रीमावशीकडे शिकून घेईल स्वयंपाक. बाईमाणसाच्या हातची चव वेगळीच. तुला काय सांगून फायदा.. तू आमरण की आजन्म ब्रह्मचारी. बाबा रे आता खाऊन घे. नंतर कोणास ठाऊक.. स्वतःच्या हाताने ..

धनंजय:- बरं बरं. जास्त बडबड नकोय. मला थोडं हनुमान चालिसा पठण करायचंय.. जरा शांत बस.

कैवल्य:- आताच तर संपवलंस ना मारूती स्तोत्र? इमर्जन्सी? परत परत आठवण येतेय हनुमानाची.. आल इज वेल ना? की काही गडबड? बिचाऱ्या मारूतीरायास जास्त त्रास नको रे देऊस..

# प्रवेश ५

स्थळ तेच. धनंजय अस्वस्थपणे येरझाऱ्या घालतोय.. मध्येच मारूतीच्या तसबिरीला नमस्कार करतो. फिरता फिरता मनाचे श्लोक म्हणतो ..

नको वासना वीषयीं वृत्तिरुपें।
पदार्थी जडे कामना पूर्वपापें॥
सदा राम निष्काम चिंतीत जावा।
मना कल्पनालेश तोहि नसावा॥

मना कल्पना कल्पितां कल्पकोटी।
नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी॥
मनीं कामना राम नाही जयाला।
अती आदरे प्रीती नाही तयाला॥

हनुमंता.. तूच सांभाळून घे. हे काय होत आहे? की होतच नाहीए काही? काहीच कळत नाही. इतके दिवस सायली आजूबाजूस होती तेव्हा काहीच नव्हते वाटत .. आता एक सोडून दोघे.. ती अशी असेलसे वाटले नव्हते.. कैवल्यपण तिच्या लिस्ट मध्ये .. ॲट लिस्ट माझा काही विचार? पण का? काही असो.. कैवल्यास सावध करणे आले.. मैत्री इज थिकर दॅन वॉटर! अँड ब्लड टू.. कैवल्या आला कसा नाहीस रे अजून?

*कैवल्य आत येतो..*

धनंजय:- थिंक ऑफ डेव्हिल.. अँड तू आलास.. म्हणजे तू डेव्हिल? उशीर केलास?

कैवल्य:- अरे तुझा फोन आला तेव्हा ..(लाजतो) काही नाही .. उगाच आपलं..

धनंजय:- हे बघ.. मी काही आपली नेहमीची मैत्रीपूर्ण गप्पा मारण्यासाठी बोलावले नाही तुला येथे..

कैवल्य:- आय नो! अळूचं फदफदं खायला बोलावलं आहेस.. सावित्रीमावशी नॉट टू बी सीन? त्यादिवशीची भाजी.. माझी

बोटं चावली गेली ती खाताना.. अशी भाजी कधी नाही खाल्ली यापूर्वी. ग्रेट!

धनंजय:- मला बोलू देशील?

कैवल्य:- अर्थात. बोल. बोलणार तूच. मैं चूप रहूंगा.. हात की घडी और तोंड पर बोट! लाइक ए शहाणा बॉय!

धनंजय:- तेच सांगायला बोलावलेय तुला. शहाणा हो. या फंदात पडू नकोस!

कैवल्य:- फंद नाही रे.. फदफदं.. की फतफतं? डोन्ट नो! काहीतरी म्हणतात खरं. पण त्यासाठी इतक्या अर्जंट?

धनंजय:- आता खरंच गप्प बस.. आणि मी काय सांगतो ते कान उघडे ठेऊन ऐक..

कैवल्य:- एक सेकंद थांब..

धनंजय:- कशाला?

कैवल्य:- अरे जरा कान उघडतो..

धनंजय:- आता तुझा कान पिळून कानउघाडणी करावी लागेल.. सायलीचा नाद सोड.. ॲज अ गुड फ्रेंड सांगतो..

कैवल्य:- सायलीचा नाद?

धनंजय:- वेड पांघरून पेडगावला नको जाऊस.. सायली एका वेळी सर्वांना फसवतेय..

कैवल्य:- हा.. हा! सर्वांना? म्हणजे तू?

धनंजय:- समीर.. त्याने स्वतः सांगितलेय मला सगळं .. आणि आता तू सांगतोयस..

कैवल्य:- ओह! अॅज अ फ्रेंड यू आर वॉर्निंग! डियर धनंजय.. लाइफ इज स्ट्रेंजर दॅन फिक्शन.. मेनी अ टाइम्स.. पण त्या आधी.. सायलीचं नाव घेताच तू का असा होतोस.. कावराबावरा? आहेस ना तू बरा?

धनंजय:- मी? मी कशाला?

कैवल्य:- असं म्हणतोस .. मग ऐक.. समीरची सायली ती ही नव्हे. योगायोग .. तिचे नाव ही सायली..

धनंजय:- कोण सायली? तू पाहिलंस तिला?

कैवल्य:- अर्थात आणि तू ही तिला भेटला आहेस.. जवळून आणि अगदी अलिकडे ..

धनंजय:- मी? नाही रे.. यू आर मिस्टेकन.. मी कशाला तिला भेटायला जातोय कुठे?

कैवल्य:- तू नाहीसच गेलास.. तीच आलेली.. इथेच.. एकदा नव्हे .. दोनदा!

धनंजय:- कधी? तुझा काहीतरी..

कैवल्य:- नंबर एक.. अबिदा उस्मान साठे.. नंबर दोन.. ज्योतिर्भास्कर श्रीराम गोळवलकर..

धनंजय:- तोंडवळकर म्हणाले ते ज्योतिर्भास्कर ..

कैवल्य:- तो नव्हे ती.. ती म्हणाली असेल.. ती. आता असे रोल करायचे तर चुका होणारच.. बिच्चारी. तुला तयार करावे म्हणून असले नाटक..

धनंजय:- तू खरे सांगतोयस?

कैवल्य:- अर्थातच. बिकॉज.. यह बंदा भी इक्वल पार्टनर इन क्राइम.. आठवून बघ त्यांचे डायलॉग्ज..

धनंजय:- तू म्हणतोस ते खरे असणार.. तरीच ती अडखळत होती.. आणि मला वाटतं एकदा ती स्वतःच्या आवाजात पण बोलली ज्योतिषी म्हणून आली तेव्हा .. यस्स .. समीरने सायली म्हणून हाक मारली तेव्हा .. म्हणजे ती सायली वेगळी .. तुझी वेगळी ..

कैवल्य:- नाही ..

धनंजय:- म्हणजे?

कैवल्य:- माझी वेगळी नाही .. कारण माझी कोणीच नाही .. जी आहे ती तुझी..

धनंजय:- म्हणजे?

कैवल्य:- म्हणजे इतकेच .. जे जे घडले ते ते घडविले गेले.. अंगावर ब्रह्मचारीपणाचे बर्फ पांघरून थंडगार पडलेल्या हिमनगा.. तुझ्यातील निद्रिस्त ज्वालामुखीचा उद्रेक घडवण्यासाठी हा बॉंबस्फोट घडवून आणला गेला.. त्या सर्वांचे प्लॅनिंग आमचेच.. म्हणजे आम्ही तिघे.. पण थोडक्यात आम्हाला जे वाटले ते तसे नाही.. म्हणजे आमचा प्लॅन फसला..

धनंजय:- छान झाले..

कैवल्य:- आम्हाला वाटले तुला तुझी सायली आवडते.. पण नाही

धनंजय:- तसं नाही रे..

कैवल्य:- नाही रे.. उगाच ओढून ताणून कुणाला आवडवून घेण्यात काय हशील? शब्द चांगलाय ना? हशील? पहिल्यांदाच वापरतोय..

धनंजय:- तसं नाही रे.. शब्द कसा का असेना.. तो वापर की न वापर.. हशील असो की नसो.. पण..

कैवल्य:- नाही आवडत सगळेच जण प्रत्येकाला.. त्याचे काही नियम नाहीत मला माहित .. म्हणून केवळ आणि निव्वळ समीरभाऊसाठी तू तशी कुर्बानी द्यावी .. नाही रे पटत.. उगाच जुलुमाचा रामराम कशाला?

धनंजय:- तसं नाही रे..

कैवल्य:- ते काही नाही, आज समीरला मी निर्वाणीचे सांगून टाकणार .. मला भरीला घालू नकोस.. धनंजय इज नॉट अॅट ऑल इंटरेस्टेड.. इन सायली..

धनंजय:- तसं नाही रे..

कैवल्य:- अरे.. रामायणातला आदर्श ठेऊन लहान भावाने मोठयासाठी त्याग करायचा की रामाने लक्ष्मणासाठी करायचा? मी तर म्हणतो समीरने ही ब्रह्मचारी व्हावे .. संसाररूपी वनवासात तुला साथ द्यावी .. जमलेच तर एखादी पर्णकुटी बांधावी ..

धनंजय:- आता गप्प होशील का?

कैवल्य:- सॉरी.. तुझ्या शपथेच्या आड आल्याबद्दल..

धनंजय:- खड्ड्यात गेली ती शपथ.. गेले काही दिवस मला झोप लागत नाही .. त्यात तुम्ही लोकं मागे लागलेत.. एक गोष्ट चांगली झालीय.. ती सायली वेगळी .. माझी वेगळी ..

कैवल्य:- तुझी? हे मी काय ऐकत आहे? एका बाल ब्रह्मचाऱ्याच्या तोंडून..

धनंजय:- खरंय ते.. फक्त ती बजरंग गुरुजींची शपथ आडवी येतेय ..

कैवल्य:- वा! तुला काय वाटले मी सांगत होतो ते खरेखुरे होते की काय?

धनंजय:- म्हणजे?

कैवल्य:- टेन्शन नॉट डियर.. नॉट अबाऊट सायली.. युवर सायली.. पण तुझं तोंड बघ आरशात.. ओढून ताणून शपथ घेतोय.. शेवटी मी सारे सांगितले ते फक्त तुझा अंत पाहण्यासाठी .. त्यात तुझ्या शपथेचा अंत दिसला.. कैवल्य केवल धन्य जाहला .. टेन्शन खल्लास..

धनंजय:- नो डियर.. टेन्शन आता सुरू.. गुरूजींना काय सांगू?

कैवल्य:- मारो गोली.. गुरूजी को..

धनंजय:- नाही .. नो गोली.. पण माझ्याकडे एक आयडिया आहे.. म्हणजे गेले काही दिवस विचार करतोय मी..

कैवल्य:- म्हणून मोठमोठ्याने मारूती स्तोत्र म्हणत होतास की काय? नको रे मना .. ना ना विकारी..

धनंजय:- दोन आयडिया.. त्यातली पहिली आता सुचली.. त्यात तुझी मदत हवी.. मला फसवू पाहताहेत..

कैवल्य:- कोण?

धनंजय:- परत वर तोंड करून विचारू धजतोस? तू आणि ती समीर सायली यांची सोनेरी टोळी.. पण मला तुझी साथ हवी.. असा प्लॅन बनव.. ती दोघे चांगलेच फसायला पाहिजेत.. म्हणजे असंच काही नवीन वेषांतर वगैरे .. तोवर त्यांना हे काही सांगू नकोस.. आपल्या मैत्रीची शपथ..

कैवल्य:- अजून एक शपथ?

धनंजय:- बघू देत दोघांना व्हॉट इट इज लाइक .. फसणे म्हणजे काय ते..

कैवल्य:- म्हणजे मी दोन्ही घरचा पाहुणा! होपफुली उपाशी नाही राहणार ..

धनंजय:- तर तो भाग पहिला. आणि पार्ट टू.. जास्त महत्वाचा.. यावर जास्त मेहनत घ्यायला हवी.. ऑपरेशन बजरंग गुरुजी ..

कैवल्य:- हे काय नवीन?

धनंजय:- गेले काही दिवस माझ्या मनात हेच चाललेय.. बजरंग गुरूजींचेच लग्न लावून दिले तर मी आणि त्यांचे इतर शिष्यही गुरूच्या पावलावर पाऊल टाकावयास मोकळे .. त्यासाठी मोठे काहीतरी जुगाड करायला हवे..

कैवल्य:- हॅत्तिच्या.. म्हणजे तुझ्यावर मेहनत घ्यायची गरजच नव्हती? फौजफाटा बजरंग चरणीच पाठवावयास हवा होता! पण आपण समीर सायलीस आधी वठणीवर आणू..

धनंजय:- ह्यास साळसूदपणा म्हणतात कैवल्य .. जणू काही तू काहीच केले नाहीस! असो.. आता मिशन सायसमीर.. नंतर ऑपरेशन बजरंग..

*सावित्री घाईघाईत आत येते..*

धनंजय:- मावशी आज उशीर झाला? काहीतरी असणार नाहीतर तुमची वेळ चुकायची नाही ..

सावित्री:- सॉरी साहेब. उशीर झाला. गुरुजी येणार होते.. त्यांना डबा दिला.. त्यास उशीर झाला.. काय बनवू?

कैवल्य:- अळूचं फदफदं! त्यादिवशी भाजी फर्मास होती.

सावित्री:- गुरूजींना फार आवडते अळूची भाजी. आणि दुसरी गवारीची. तेलावर केली की छान बनते.. त्यादिवशी गवार

अगदी ताजी आणि कोवळी मिळालेली.. गुरूजी डबा घेऊनच गेले तालमीत. चला मी कामाला लागते..

*सावित्री आत जाताना कैवल्य डोळ्यांनी इशारा करतो.. मग हळूच कैवल्यच्या कानाकडे कुबुजतो..*

कैवल्य:- हे खरंय धनंजय.. असं झालं ना तर सारे प्रॉब्लेम खल्लास..

धनंजय:- पण हे घडावे कसे?

कैवल्य:- नथिंगीजिंपॉसिबल.. मी समीरला पण तेच सांगितलेले.. सो गॉट वन आऊट.. तुझी विकेट गेली.. सेल्फ हिट असेल पण मेड यू प्ले दॅट वे.. सायलीची मेहनत कामी आली.. तर आता पुढे .. व्हेअर देअर इज अ विल.. देअर इज अ वे! तेव्हा कामाला लागा.. पवनसुताचे भक्त तुम्ही.. आपली विचार चक्रं वायुवेगाने फिरू द्यात.. . आपली अक्कल घोड्यापुढे पळवा .. मग बघा यश तुमचेच आहे!

धनंजय:- असाच पेप टॉक दिला होतास की काय समीर आणि सायलीपुढे..

कैवल्य:- करना पडता है भाई. नाहीतर सायली एवढया मोठ्या कामाला तयार झाली असती का? विचार करा.. मना विचार सामर्थ्य मोठे असे रे.. मना विचारात हयगय नको रे.. थोडक्यात काय तर कामाला लागा..

धनंजय:- पण मिशन सायसमीर फर्स्ट!

कैवल्य:- तसे तर तसे! मला काय स्क्रिप्ट लिहायची नि डायरेक्ट करायची.. बाकी नाटकात आहेतच.. कलाकार ..नेहमीचे यशस्वी!

# अंक दुसरा

# प्रवेश १

समीरचेच घर. धनंजय येरझाऱ्या घालतोय. स्वतःशीच पुटपुटत ..

घरी कामधेनू पुढें ताक मागें।
हरीबोध सांडोनि वेवाद लागे॥
करी सार चिंतामणी काचखंडे।
तया मागतां देत आहे उदंडे॥

काय करावे? रघुनायका मागणे एकचि आता.. बजरंग गुरुजींचे मनपालट.. हे करावे कैसे? एकदा तो गड सर केला की पुढचे सर्व आपोआप पार पडेल.. हेचि दान देगा देवा..

कैवल्य आत शिरतो..

कैवल्य:- धनंजय.. ऑल सेट.. प्रथम ऑपरेशन सायसमीर.. उलगडत आहे आपल्या समोर.. लवकरच.. दिल थामके बैठिए.. भाईयों और बहनों.. इथे कोणी बहनों नाही तरीही..

धनंजय:- किती बोलशील.. आणि काय सांगतोस? इतक्या लवकर तू सर्व मॅनेज केलेस? अरे, आपण बोललो त्याला दोनचारच तर दिवस उलटून गेले.. इतक्यात सारे प्लॅनिंग .. नक्की काय घडणार आहे?

कैवल्य:- आगे आगे देखिए होता है क्या.. फक्त यात मला दोन्हीकडची खबर आहे.. आणि नो लेस क्रेडिट टू समीर आणि त्याची सायली .. म्हणतात ना, इच्छा तेथे मार्ग .. आणि प्रखर इच्छा तिथे तितकाच डेस्परेट मार्ग! लवकरच येत आहेत.. सायसमीर..

धनंजय:- चला.. तितकाच दोन घडीचा विरंगुळा ..

कैवल्य:- हुं.. मी आत लपतो.. समीरला आत येऊ देऊ नकोस ..

धनंजय:- छान.. डायरेक्टर पडद्यामागेच!

कैवल्य:- अर्थातच! पण या नाटकात माझाही रोल आहे.. तेव्हा बी स्मार्ट टू अंडरस्टॅंड!

धनंजय:- म्हणजे?

कैवल्य:- म्हणजे तेच! बी स्मार्ट! किंवा बी स्मार्ट इनफ! आगे आगे देखिए होता है क्या!

*कैवल्य आत निघून जातो.. समीर आत येतो.*

समीर:- दादा.. बरं झाले तू घरी आहेस. तामसी बुवा येत आहेत घरी..

धनंजय:- हे कोण बुवा.. मला माहित नाही बुवा..

समीर:- तामसी बुवा रे. समर्थाचिये सेवक म्हणवतात स्वतःला. रामदासी बुवा.. संन्यास घेऊन देशभर पदभ्रमण करत असतात. नुकतेच ते इथे पोहोचलेत..

धनंजय:- तुला बरे एकेक जण भेटत जातात.. आधी ते ज्योतिषी आता रामदासी.. त्याआधी अबिदा.. भेटतात की ..?

समीर:- दादा, तुझ्यासाठी गळ घातली त्यांना. ते मुद्दाम येथवर येणार आहेत. तू बजरंग गुरूजींचा शिष्य म्हणालो तर ते तयार झाले. तुला ठाऊक आहे गुरूजी त्यांचेच शिष्य आहेत.

धनंजय:- बजरंग गुरूजी? कधी म्हणाले नाहीत ..

समीर:- नसतील म्हणाले .. ते काय सर्व पूर्वेतिहास सांगणार थोडीच तुला? तामसी बुवा कधीही येतील इकडे.

धनंजय:- तामसी बुवा! पण नाव नक्की तेच आहे ना.. म्हणजे मागे त्या ज्योतिर्भास्करांचे नाव बदलले होते..

समीर:- असणार. म्हणजे माझा काही या क्षेत्रात अभ्यास नाही.. पण तेच असणार. मी फक्त तुझी भेट घडवावी म्हणून बोलावलेय घरी.. बुवा थोडे रागीट वाटतात..

धनंजय:- चालायचंच.. बोलून चालून नावच तामसी! आणि वेगवेगळे रोल करायचे तर कुणीही रागावणारच..

समीर:- रोल?

धनंजय:- अरे.. किती धकाधकीचे आयुष्य.. कधी समर्थाचिये सेवक बनून शहरात तर कधी थेट हिमालयात .. शहरात भर गर्दीत साधू म्हणून फिरण्याचा रोल.. जंगलात निसर्ग सान्निध्यात ..

*बाहेरून आवाज येतो..*

**अलख निरंजन..**

*समीर बाहेर जाऊन तामसी बुवांना घेऊन आत येतो..*

समीर:- यावे महाराज.. यावे

*बुवा पूर्ण भगव्या कफनीत, लांब पांढरी दाढी..  खांद्यावर पांढरी झोळी.. .. नवेकोरे कापड असल्यासारखी जाणवतेय. पायात खडावा.. केसांचा बुचडा डोक्यावर .. आणि डोळ्यांवर चष्मा..*

बुवा:- अलख निरंजन.. श्रीराम जय राम जय जय राम.. जय जय रामकृष्ण हरी.. जय जय रघुवीर समर्थ

धनंजय:- नमस्कार करतो बुवा ..

बुवा:- आम्हाला पाया पडून नमस्कार केलेला चालत नाही. तसा नमस्कार फक्त भगवंताच्या चरणी.. आणि गुरूचरणी..

धनंजय:- तुम्हीच माझे गुरू. मला तुमचा शिष्य व्हायचे आहे.. बुवा आपण मला उपकृत करावे.

बुवा:- थांब. आम्ही कोणासही असे शिष्य बनवीत नसतो.. त्यासाठी आमची खास पद्धती आहे..

धनंजय:- म्हणजे एन्ट्रन्स एक्झाम वगैरे? नॅशनल लेव्हल? ऑल इंडिया साधु एन्ट्रन्स? ए आय सी ई?

बुवा:- आम्ही खरेतर तामसी बुवा. रागावलो असतो एरव्ही. पण आम्ही सध्या नि राग मास पाळत आहोत.. त्यामुळे आम्ही रागावणार नाही. तुझी कल्पना चांगली आहे. दूरदूर दुर्गम भागात आमचे शिष्यगण पसरले आहेत.. त्यांना आम्ही शिष्य वृत्ती देत असतो..

धनंजय:- म्हणजे स्कॉलरशिप?

समीर(विषय बदलण्याचा प्रयत्न करत):- बुवा.. काय घेणार? दूध? केळी?

बुवा:- आम्ही फक्त काळ्या मनुका खातो.. साडे दहा.. बियांसकट.. आणि अडीच खजूर, काळी.. ती नसेल तर खारीक अडीच. बिया सोडून. आमच्या तब्येतीस त्याहून अधिक झेपत नाही. वय झाले आमचे. आखाड्यातील शरीर आमचे. पण देवाधिदेवास ही कुठे मृत्यू टळला. कुठेतरी सज्जनगडावर देह ठेवण्याची एक इच्छा बाळगून आलो आम्ही इथे. हा म्हणाला,

तू समर्थांचा सेवक. त्यात बजरंगाचा शिष्य. म्हटले भेट घ्यावी. आणि पुढे जावे.

धनंजय:- तुम्ही तर अत्यंत तरूण दिसता बुवा. म्हणजे ही दाढी सोडली तर..

बुवा:- तरूण? हिमालयात तपश्चर्या केली आम्ही सव्वा पन्नास वर्षे .. आल्प्स मध्ये साडे दहा वर्षे.. किलिमांजारोवर दोन वर्षे सात दिवस.. त्यानंतर भारतभर भवति न भवति.. भिक्षां देही करत. त्यामध्ये तावून सुलाखून निघालेली ही देहाची कुडी. बलोपासना आणि समर्थंचा संदेश गावोगावी पोहोचवतो आम्ही.. त्यात आम्हास थोडी दैवी विद्या प्राप्त झाली..

धनंजय:- दैवी विद्या? सुदैवी!

समीर:- कसली दैवी विद्या बुवा?

बुवा:- तर आम्ही समर्थांचिये सेवक. सर्व भूमंडळी संचार आमचा. आमचा देह ठेवण्याची घटिका समीप येत आहे..

धनंजय:- म्हणजे बुवांना झोप येत आहे की काय? अडीच खारका न खाता झोपू नये बुवांनी..

समीर:- बुवा.. थोडे नादान आहेत आमचे थोरले बंधू..

बुवा:- नादान? नाही.. त्याच्या ललाटरेखेवर स्पष्ट आहे.. यांची प्रथम कन्या अत्यंत हुशार अन् तेजस्वी निपजणार असून द्वितीय पुत्र तिन्ही लोकी झेंडे रोवेल ..

समीर:- पण बुवा .. ह्या समर्थसेवकाने शपथ वाहिली आहे गुरूचरणी. आजन्म ब्रह्मचर्य.. कडक ब्रह्मचर्य ..

बुवा:- ते काही असो.. ललाटरेखेवरील लेख म्हणजे काळ्या दगडावरची रेख.. नव्हे रेघ..

समीर:- खरंय बुवा. मी देखील या धनंजयास काळा पाषाणच म्हणतो.. त्यावरील रेघ.. सत्य आहे..

धनंजय:- बुवा त्याच्याकडे ध्यान देऊ नये. आपण ललाटरेषा डिकोडिंग करावे. आपली दैवी शक्ती वापरून..

बुवा:- तर या ललाटरेखेवरील लेख.. त्यात चूक होणे नाही. समर्थाचिया सेवका वक्र पाहे.. असा सर्व भूमंडळी कोण आहे? जय जय रघुवीर समर्थ ..

धनंजय:- सांगावे बुवा.. या समीरकडे पाहूनही सांगावे. मागे एक ज्योतिषी आले होते.. श्रीपाद वळवळकर .. असे काही..

बुवा:- श्रीरंग तोंडवळकर असणार .. आम्ही ओळखतो. श्रीरंग ललाटरेखा वाचावयास आमच्याकडे होता .. हस्तसामुद्रिक मोठा. पण रागीट फार.. तर काय म्हणत होता श्री..?

धनंजय:- विशेष काही नाही. आमच्या दोघांचे भविष्य एनट्यांगल्ड आहे म्हणाले.. या समीरने खास बोलावून घेतलेले त्यांना..

समीर:- अचूक. त्यांचे भविष्यकथन आणि अल्ला सचूक .. नाही सल्ला अचूक..

धनंजय:- तर या जन्मात तरी आम्ही विवाहापासून दूर रहावे सांगितले आहे त्यांनी..

बुवा:- ललाटरेषेवरील पंचेचाळीस अंश कोनातून जाणारी ती रेषा त्याच्या ध्यानात आलेली दिसत नाही. होते. मोठमोठ्यांकडून ही चूक होऊ शकते.. पण श्री कडून अशी चूक अपेक्षित नाही.. असो. आता आम्ही निघावे म्हणतो.. जास्त काळ एका ठिकाणी थांबत नाही आम्ही.. पवनसुताचे भक्त. वाऱ्याहूनही जलद आणि चपळचरण..

धनंजय:- पण बजरंग गुरूजींस भेटून जावे बुवांनी..

बुवा:- एकमेव आमचे शिष्य ज्यांचा आम्हास अभिमान आहे.. बजरंग गुरूजी. आम्ही त्यास कसे विसरू?

आतून कैवल्य बजरंग गुरूजींच्या वेशात येऊन पाठी उभा राहतो.. समीर गुरूजींना बघून दचकतो..

बुवा:- बजरंगाला आम्ही कालच भेटलो.. मोठाच हुशार निपजला. दहा वर्षे तालमीत होता आमच्याकडे.. तस्सा आहे अजून. कसे विसरणार आम्ही त्याला.. अजून डोळ्यासमोर आहे तो .. नजर आमची तीक्ष्ण आहे अजूनही. चष्मा आहे तो आम्ही दुनियेकडे वेगळ्या नजरेने पाहण्यासाठी चढवलेला.. बजरंग म्हणजे आमचा शिष्य.. गुरूसही असते उत्तम शिष्याची आस.. काल भेटला.. शिष्यामुळे गुरू धन्य जाहला..

*कैवल्य येऊन एकाएकी पाया पडतो.*

कैवल्य:- गुरूजी .. पाया पडतो..

बुवा:- कोण? कोण तू? उठ.. उठ. फक्त आमचे शिष्य आमच्या पाया पडतात..

धनंजयच्या ध्यानात एकाएकी येते.. कैवल्य आणि बजरंग गुरुजींत साम्य आहे खूप.. कैवल्याचे हे सोंग लक्षात येत..

धनंजय:- बुवा ओळखले नाहीत .. आपला शिष्योत्तम.. बजरंग गुरुजी .. कालच भेटलेलात..

बुवा:- कोण? बजरंगा? (एकाएकी आंधळेपणाचे सोंग घेत) वय झाले.. नजर अधू झाली..

धनंजय:- बुवा, अधू नजरेने ललाटरेषा मात्र दिसली तुम्हाला .. धन्य ती दैवी शक्ती बुवा. मला तुमचे शिष्यत्व द्या.. नाही म्हणू नका.. हे तुमचे लाडके बजरंग गुरुजी आहेत .. कालच भेटलेले .. हो की नाही समीर?

समीर:- हो ना.. वय झालं की होतं..

धनंजय:- वय तर खरंच..

बुवा(गडबडीत) :- आम्हाला निघावयास हवे. बजरंगा.. निघतो आम्ही. निघावयास हवे.. आम्ही पवनसुतासारखे चंचल .. भिक्षां देही करत सज्जनगडी पोहोचलो की मोकळे .. बजरंगा या आपल्या शिष्यास सांभाळून घे..

सावित्रीबाई घाईघाईत आत येतात .. कैवल्यकडे पाहातात .. आत जाता जाता..

सावित्री:- गुरूजी, तुम्ही इथे आहात होय.. मी तिकडे वाट पाहात होते.. म्हणून उशीर झाला.. डबा नको की काय आज?

*आत निघून जातात..*

बुवा:- चला.. निघून जायला हवे.. कालपव्यय नको..

बजरंग:- होय स्वामीजी. चला मी पण येतो तुमच्या बरोबर .. धनंजया.. बुवा निघाले. मी बुवांना सोडून येतो..

धनंजय:- होय गुरूजी.. पण बुवा अडीच खारका खाऊन गेला असता तर..

बुवा:- दया रघुराया.. कष्टविसी काया.. नको मोह माया.. वेळ जाई वाया.. आम्ही जातो अमुच्या गावा .. अमुचा विसर पडावा.. जय जय रघुवीर समर्थ..

*बुवा आणि कैवल्य निघून जातात ..*

समीर:- बुवा गेले.. तेजस्वी माणूस..

धनंजय:- हिमालयातल्या तपाचे तेज का लपून राहते..? आणि थेट आल्प्स मध्ये ही.. धन्य वाटले भेटून..

समीर:- पण आज एकाएकी बजरंग गुरूजी कुठून आले? तू तर म्हणालेलास आज ते गावी जाणार आहेत..

धनंजय:- अरे सदाफटिंग माणूस. आज इथे उद्या तिथे. पण आजचे बुवा तेजस्वी होते फार. त्यांचे शिष्यत्व पत्करायला आवडेल मला..

समीर:- पण एक गुरूजी आहेत की बजरंग .. अजून एक? आणि आता ते तामसी बुवा कुठे भेटणार..

धनंजय:- अरे भेटतील.. भेटतात परत माणसं. तुला सांगायचे राहिलेच.. ती अबिदा भेटलेली परत..

समीर:- तुला?

धनंजय:- आणि ते तोंड आणि गोळ वळकर गुरूजी सुद्धा ..

समीर:- काय सांगतोस? कधी?

धनंजय:- कधी काय .. आताच तर येऊन गेले.. तुझ्या समोर..

समीर:- काहीतरीच काय..?

धनंजय:- काहीतरीच नाही. खरंच! पण छान आहे..

समीर:- काय छान आहे?

धनंजय:- आणि हुशार ही..

समीर:- कोण?

धनंजय:- आईलाही आवडेल.. नक्की..

समीर:- तू कशाबद्दल..

धनंजय:- त्या अबिदाबद्दल.. चांगली आहे ती.. अबिदा.. ऊर्फ समीरा.. ऊर्फ अख्तरी ऊर्फ तुझी सायली.. हुशारही आहे.

समीर:- ...

धनंजय:- आणि आय ॲडमिट .. दोन्ही वेळा मी फसलो.. क्रेडिट तिच्या ॲक्टिंगला..

समीर:- दादा.. फसलो नको म्हणूस रे..

धनंजय:- पण आज मात्र तुम्ही फसलात.. कैवल्यनी डबल ढोलकी प्लॅन बनवला .. त्यात बुवा चांगलेच फसले तुझे .. बट शी इज गुड..

समीर:- कोण?

धनंजय:- तुझी सायली. शी इज गुड.. आणि थ्यांक्स..

समीर:- कशाबद्दल?

धनंजय:- माझी सायली मिळणार मला .. तुमच्या ह्या कारनाम्यामुळे आता मी माझी शपथ मोडणार ..

समीर:- खरंच दादा..?

धनंजय:- हुं.. मला काहीतरी कारण हवेच होते.. ते पुरवल्याबद्दल थ्यांक्स.. (हळूच) फक्त आता बजरंग गुरूजींना लग्नाच्या बेडीत अडकण्यासाठी तयार केले की ..

समीर:- की जीवनाशी एकनिष्ठ होण्याचा मार्ग मोकळा! हेच ना? वरी नॉट ब्रो.. आजपासून नवीन मिशन.. ( हळूच) मिशन ब.. मिशन बजरंग..

# प्रवेश २

*समीरचे घर. एक फळा.. समोर खुर्चीवर कैवल्य बसलेला. बाजूला समीर आणि सायली.. दुसरीकडे धनंजय आणि सायली..*

*कैवल्य फळ्यावर लिहायला लागतो..*

मिशन ब..

मित्रांनो.. हे मिशन बजरंग आहे. अतिशय नाजूक मिशन असल्याने त्याचे नावही पूर्ण लिहिण्याची परवानगी मी मलाच नाकारली आहे. काय आहे हे मिशन.. (फळ्यावर आकृती काढत) हे समजा बजरंग.. त्यांच्या शिष्यगणात हा मोठा गोळा धनंजय.. त्याचा लहान भाऊ समीर.. छोटा गोळा. आता या आकृतीत माझ्यापुढे दोन गोळ्या.. सॉरी दोन सायल्या आहेत.. त्यांची भविष्ये या मिशनशी थेट जोडली गेलेली आहेत.. सायली सीनियर.. विथ धनंजय, द ग्रेट एक्स ब्रह्मचारी .. आणि हे पार पडले तरच सायली ज्युनिअर विथ ज्युनिअर सावंत.. आणि पहिले पार पडण्यासाठी

बजरंगाची कमाल झाली तरच धमाल होणार आहे.. थोडक्यात या मिशनचा डायरेक्टर म्हणून मी तुमच्या सूचना मागत आहे.

समीर:- मला वाटतं एकूण मिशनला मिशन ब ऐवजी मिशन ब्र म्हणजे ब्रह्मचारी नाव द्यावे. त्याचा अर्धा भाग मिशन अ म्हणजे आद्य ब्रह्मचारी धनंजय पार पडला आहे. अत्यंत यशस्वीरित्या. याबद्दल डायरेक्टर कैवल्य यांचे आभार मी दोन्ही सायल्यांच्या वतीने आणि परवानगी असल्यास धनंजयच्या वतीनेही मानत आहे.. ते ही थोडीफार धनंजयची क्षमा मागून..

कैवल्य:- आता औपचारिक आभार प्रदर्शन पुरे.. रात्र थोडी सोंगे फार..

धनंजय:- यस्स.. अबिदा साठे... गोळवळकर.. तामसी बुवा.. रात्र कसली.. दिवस थोडे सोंगे फार..

सायली सीनियर:- पण माझे समीरला अनुमोदक आहे..

धनंजय:- आणि आद्य ब्रह्मचारी एकच.. बजरंग गुरूजी .. आणि न.. क नाही .. अनुमोदन .. मोदक कसला ..

सायली सीनियर:- तेच म्हटली मी.. अनुमोदक. उगाच चिडवायला नको..

कैवल्य:- तर धनंजय आणि सा.सीनियर.. नव्याची नवलाई म्हणून प्रेमयुक्त भांडणसदृश संवाद आपण सध्या राखून ठेवावेत.. आणि मिशन ब किंवा खरेतर मिशन ब्र चा दुसरा भाग मिशन ब वर लक्ष केंद्रित करावे. कारण त्यातच सर्वांच्या उज्ज्वल भविष्याची ब म्हणजे बिया.. म्हणजे बीजे आहेत..

सायली सीनियर:- तू कुठला नेता बिता आहेस का? भाषणं ठोकतोयस..

धनंजय:- अगं तो नेता नव्हे जेता आहे. मास्टर स्ट्रॅटेजिस्ट आहे. विचार धाकट्या सायलीला..

सायली ज्युनियर:- हो ना. पण डायलॉग वन सायडेड.. म्हणजे धनंजय काय बोलेल याचा अंदाज नाही.. मग डायलॉग जमतील तसे..

धनंजय:- म्हणून डायरेक्ट मलेरिया व्हॅक्सीन आणि सज्जनगड?

सायली ज्युनियर:- टेन्शनमध्ये मनाला येईल ते..

धनंजय:- बट यू डीड वेल! शेवटचा बुवा पण चांगलाच होता.. बट फॉर धिस बजरंग गुरूजी लूक अलाइक.. नाहीतर कुणाला संशय नसता आला..

समीर:- थ्यांक्स..

धनंजय:- तू कशाला थ्यांक्स म्हणतोयस.. मी सा.ज्युनिअरला सांगतोय..

समीर:- तेच ते.. हो की नाही साय?

कैवल्य:- बालकांनो.. कामावर लक्ष केंद्रित करा..

समीर:- म्हणजे? मी आणि साय जाऊ?

धनंजय:- काय दिवस आले.. मोठया भावासमोर.. जरा तरी शरम?

समीर:- आपण माझे आदर्श आहात बंधुराया.. पण लेट्स् गेट बॅक.. तर आता बजरंग गुरूजी.. माहिती असलेल्या गोष्टी .. ही इज अ स्टबॉर्न ब्रह्मचारी .. व्यायामाची आवड .. जुन्या चिमणराव सीरियल मधला गुंड्याभाऊ भाऊ वाटावा अशी पर्सनॅलिटी .. स्वभावाने कडक.. शिस्तीचा माणूस. सहजासहजी आपल्या कचाटयात सापडणे कठीण ..

सायली ज्युनियर:- मला वाटते आपण आधी केले तसे नाटक नको करायला. नवी काही ट्रिक पाहिजे ..

सायली सीनियर:- माझा धनंजयच जास्त काहीतरी सांगू शकेल..

समीर:- तुझा तर तुझा.. बोल रे..

धनंजय:- मी एक महत्त्वाचा मुद्दा सांगतो.. तो म्हणजे सावित्रीबाई..

सायली दोन्ही:- कोण? कोण सावित्रीबाई?

धनंजय:- आपल्याकडच्या स्वयंपाकीणबाई. अळूचं फदफदं स्पेशालिस्ट .. मला वाटते.. १. सावित्रीबाईंना गुरूजींबद्दल सॉफ्ट कॉर्नर आहे. तो घासून अजून मऊ करावा. तुला आठवतं पहिल्यांदा त्या तू असताना आल्या होत्या .. कैवल्य तेव्हा तुला पाहून दचकल्या. तुझं गुरूजींसारखे दिसणे.. बाई दचकलेल्या.. आणि त्यादिवशी .. तामसी बुवा आले होते तेव्हा ही.. तू नोटिस नसशील केलं पण माझ्या बारीक नजरेतून नाही सुटले ..

कैवल्य:- हो .. फारच बारीक नजर तुझी .. अबिदाला विचारायला पाहिजे ..

धनंजय:- तू गप रे.. तर मला वाटतं शी लाइक्स हिम. त्यांच्या बोलण्यात निम्म्या वेळी गुरूजींचाच विषय असतो .. आणि नंबर २.. मला वाटते गुरूजींचा हिमनग वितळत आहे.. कल्पना करा गुरूजी रोज डबा घ्यायला बाईंकडे जातात. चोपून जेवणारे नाहीत गुरूजी.. पण अळूची भाजी चाटून पुसून खातात.. यह प्यार नहीं तो क्या है मेरे दोस्त?

समीर:- पण तुझ्या बाबतीत सांगायचं तर.. यातलं काही नाही झालं.. तू काही ह्या सीनियर सायलीकडे अळूची भाजी खायला जात नाहीस ..

सायली ज्युनियर:- तुला काय माहिती .. जात ही असेल. हळूहळू खात असेल अळू..

धनंजय:- बस क्या.. तुम्ही माझ्यावर घसरलेत.. पण मुद्दा मिशन ब्र च्या पार्ट ब चा आहे..

कैवल्य:- हे खरं आहे. आणि हे मिशन कठीण आहे.. बजरंग गुरूजी वयाने मोठे आहेत.. धनंजयसारखी ट्रिक त्यांच्यावर चालायची नाही.. थोडक्यात करावे तर काय करावे?

समीर:- आणि काही गडबड झाली तर आपल्या मुंड्या पिरगळायचे गुरूजी.. ह्या धनंजयचे काही एवढे टेन्शन नव्हते ..

सायली सीनियर:- माझा धन पण मुंडी पिरगळू शकतो..

धनंजय:- मुंडी.. पिरगळतो.. कोंबडीची पण.. बाय द वे.. ही सायली चिली चिकन मस्त बनवते..

समीर:- तुला बरी माहिती .. नया नया जोडा.. पण झाग ढेर सारा.. सबकी पसंद सायली.. इतक्यात माहिती किती..

कैवल्य:- अरे.. दॅट ब्रह्मचर्य वॉज ओढून ताणून चंद्रबळ. एक डोळा हिच्यावर .. दुसरा .. बजरंग गुरूजींवर.. काय करणार .. वयाचा दोष..

सायली सीनियर:- तुम्ही धनला उगाच डिवचू आणि चिडवू नका.. बिच्चारा धन.. एकतर बिचारा कित्येक दिवसांपासून टेन्शन मध्ये.

कैवल्य:- ते तूच दिलेले.. बोल धन.. कैसा था तेरा मन?

धनंजय:- तर मला वाटतं की आपण थोडे दिवस जाऊ द्यावेत..

सायली ज्युनिअर:- थोडे दिवस? माझ्या घरी जोरदार तयारी सुरू आहे. अजून काही दिवस मी किल्ला लढवेन.. पण .. किती दिवस मी तग धरू शकेन?

धनंजय:- माझा पॉइंट असा.. ज्या पद्धतीने गुरूजी बाईंना भेटतात वगैरे .. दाल में कुछ काला है जरूर..

सायली सीनियर:- अरे धन, दाल में काला नही.. ती सालवाली उडिद डाळ असते ना ..

धनंजय:- अगं .. आगीजवळ लोणी न वितळता राहूच शकत नाही. माझा या विषयातला अभ्यास..

कैवल्य:- हे खरंय.. स्वाध्याय म्हण.. मी स्वतः पाहिलेय.. (धनंजयकडे बोट दाखवत) हा बर्फाचा गोळा वितळताना.. (सायली सीनियर लाजते)

धनंजय:- आता विषयास फाटे नकोत.. मिशन ब्र पार्ट ब वर लक्ष देऊयात..

समीर:- तोच विचार करतो आहोत.. डोके खाजवून आता केस गळतील .. पार्ट अ म्हणजे मिशन धनंजयनेच थकवले बिचाऱ्या सायलीला..

कैवल्य:- ते काही असो.. अशी ॲक्ट्रेस मिळाली म्हणून लिहिता आली ती स्क्रिप्ट..

समीर:- थ्यांक्यू..

धनंजय:- तू कशाला थ्यांक्यू.. कॉंप्लिमेंट इज फॉर सा.ज्युनियर ..

समीर:- तेच ते.. हो की नाही डियर साय?

कैवल्य:- आता तुम्ही सारे विचार करा.. माझी जायची वेळ झाली.. उशीर झाला तर.. मला फाडून खाईल..

धनंजय:- कोण?

समीर:- कोण काय? तीच..

कैवल्य:- कोणीही असेल.. पण तिचे नाव सायली नाही एवढे नक्की .. नाहीतर आपल्याला सायल्यांना नंबर द्यावे लागले असते! तर तुम्ही किल्ला लढवा.. नंतर येतोच मी..

समीर:- पण तू तिला पटवायला कुठले नाटक केलेलेस सांगितले नाही ..

कैवल्य:- मी आणि नाटक? ते मिशन ब्र यांच्यासाठी .. आमचे मिशन ब.. ब फॉर बटरफ्लाय..

सायली ज्युनिअर:- तर तुझ्या त्या फुलाकडे तुझ्या मनाचे पाखरू उडत उडत चाललेय.. जा.. कैवल्य ..

समीर:- जी ले अपनी जिंदगी..

कैवल्य(घड्याळाकडे पाहात):- खरेच निघतो.. माझी प्राणकलिका.. मी येतोय ..

*कैवल्य निघून जातो..*

धनंजय:- प्राणकलिका? हा जुन्या नाटकात कामबिम करायचा काय?

सायली सीनियर:- असं रे काय धन.. हाऊ रोमँटिक की नाही?

धनंजय:- हो ना प्राणप्रिये.. असं वाटतं ही समय कलिका उमलूच नये.. काळ गोठून त्यात हे क्षण एखाद्या बर्फासारखे ..

सायली सीनियर:- आइस्क्रीमसारखे म्हण ना..

धनंजय:- हाऊ रोमँटिक .. काळ गोठून त्यात हे क्षण आइस्क्रीम सारखे थिजून रहावेत.. पण कुठले? चाॅकलेट की व्हॅनिला?

सायली सीनियर:- बटर स्कॉच.. धन

धनंजय:- होय प्रिये.. काळ गोठून त्यात हे प्रेमाचे क्षण बटर स्कॉच आइस्क्रीमसारखे थिजून रहावेत..

समीर:- वा! काय प्रेम संवाद! नवीन मुसलमान जास्त बिर्याणी खातो.. तसा नवा प्रेमी जास्तच काव्यमय बोलतो.. जमत नसेल तरीही! हो की नाही साय?

सायली ज्युनिअर:- मी काय बोलणार यावर नाथ?

*बजरंग गुरूजी आत येतात .. मग पाठी बघतात.. आजूबाजूला पाहतात..*

बजरंग:- मी तुझ्याच घरात आलोय ना रे धनंजय?

धनंजय:- अर्थात गुरूजी .. का विचारता असे?

बजरंग:- या दोन कन्यका? तुझ्या घरात? मारूतीराया. .बलभीमा..

धनंजय:- होय गुरुजी हे माझेच घर.. आपलेच समजावे ..

समीर आणि सायली ज्यु. वाकून पाया पडतात..

आशीर्वाद द्यावा गुरूजी..

बजरंग:- सुखी रहा समीर.. मग ही कोण? ( *दुसऱ्या सायलीकडे वळून)*

*धनंजय आणि ती दोघे पटकन गुरूजींच्या पाया पडत..*

आम्हालाही तो द्यावा गुरूजी..

गुरूजी रागाने बघतात ..

गुरूजी:- धनंजय, ही अपेक्षा नव्हती तुझ्याकडून.. तू आणि तुझे वचन.. तुझी शपथ..

धनंजय:- मोडली ती गुरूजी..

गुरूजी:- ते दिसतंय.. मी निघतो.. इथं आता थांबण्याची इच्छा नाही माझी .. निघतो मी.

गुरूजी जायला वळतात.. धनंजय मागोमाग जात..

गुरुजी ऐका तर..

गुरूजी:- मी उद्या येईन परत.. धनंजय तुला एकट्याने भेटायचेय.. मग बोलू आपण..

*गुरूजी झटक्यात निघून जातात ..*

सायली सीनियर:- आता काय? गुरूजी तर रागावलेले दिसतात चांगले..

सायली ज्युनिअर:- आता पुढे?

समीर:- एक सेकंद .. धनंजय.. आर यू शुअर ते गुरूजीच होते? की परत कैवल्यच सोंग घेऊन..

सायली ज्युनिअर:- कैवल्य करू शकतो असं.. म्हणून घाईघाईत निघून गेला..

धनंजय:- नाही. ते गुरूजीच होते.. मी ओळखतो त्यांना जवळून..

समीर:- पण दोघांत साम्य किती.. कैवल्य मेकप करून येईल तर..

धनंजय:- चामखीळ..

सायली सीनियर:- म्हणजे धन? दातखीळ बसते तशी?

धनंजय:- चामखीळ.. डाव्या डोळ्याखालची..

सायली ज्युनिअर:- तो कैवल्यनी पण बनवला असणार .. त्यादिवशी पण होताच ना..

धनंजय:- होता.. पण टू डी.. ओरिजिनल थ्री डी.

सायली सीनियर:- म्हणजे रे धन? तू असा कोड्यात बोलू नकोस ना..

धनंजय:- तुम्ही लक्ष देऊन नाही पाहिले .. कैवल्यनी मेकप ने बनवलेला चामखीळ नुसता फ्लॅट मार्करने बनवलेला होता.. नि गुरूजींचा चामखीळ डोळ्याखाली लोंबकळतो. थ्री डायमेन्शल अगदी..

सायली सीनियर:- तू किती हुशारेस रे धन.. म्हणून तू मला आवडतोस..

धनंजय:- मला पण प्राणलतिके..

समीर:- थोडा प्रेमसंवादात व्यत्यय आणून विचारतोय.. म्हणजे हे ओरिजिनल गुरूजीच होते तर.. आता पुढे काय?

धनंजय:- काय? मुंडी पिरगळून घ्यायची तयारी ..

सायली सीनियर:- मग तुला दुखेल खूप.. माझ्याकडे महानारायण तेल आहे.. मी चोळून देईन हां.. तू घाबरू नकोस.. की आधीच देऊ लावून तुला धन?

सायली ज्युनिअर:- मला वाटतं आधी मुंडी पिरगळून झाली ना की किती पिरगळवली जाते त्याच्यावर आहे.. तसे गुरूजी चांगले आहेत.. कदाचित नुसता हात पिरगळून सोडून देतील..

सायली सीनियर:- मग मुंडीचे तेल उगाच वाया जाईल.. बरोबर आहे तुझे..

धनंजय:- काही असो.. उद्या आलिया भोगासी सादर व्हावे लागणार .. तेही मला.. मलाच..

समीर:- घाबरू नकोस ब्रो.. हम सब तुम्हारे पीछे हैं..

# प्रवेश ३

समीरचे घर. तो विचारमग्न बसला आहे.. त्याचा फोन वाजतो.. पलीकडे सायली ..

समीर:- बोल साय..

सायली - काय बोलू? आज गुरूजी येतील.. मग पुढे काय?

समीर:- पुढे? आजवर जसा मार्ग निघाला तसा निघेल .. होप फॉर द बेस्ट ..

सायली - होप.. आशा इज होप! आशेवर जग जगते आणि तगते .. आशेने सारे मी ही चहूकडे बघते. आस आणि आशा.. कठीण आहे समीर .. दोन दिवसांनी कुणीतरी येणारे..

समीर:- आय नो.. थोडे थांब.. आजचे बघू किती आणि काय होते.. मला वाटते आपण तिथे असायला हवे..

सायली - यस.. गुरूजींचे बोलणे ऐकले ना की काहीतरी हिंट मिळेल आपल्याला.. मी येऊ?

समीर:- मी तुला नाही म्हणेन का कधी? उंबरठ्यावर माप ओलांडून कधी येतेस ते बोल ..

सायली - तुला गंमत सुचतेय.. पण मी येतेच.. आपण आतून ऐकूया काय बोलतात गुरूजी ते.. म्हणजे कैवल्यच्या स्क्रिप्टमध्ये उपयोगी पडेल..

समीर:- परत सायलीउद्दीन.. मिशन ब्र पार्ट ब मध्ये .. तशी ती तामसी बुवांची दाढी शोभते तुला ..

सायली - चुप रे. उगाच. इकडे टेन्शन नि तुला गंमत सुचतेय.. पण मी येतेच..

समीर:- येच.. वेटिंग..

*धनंजय आत येतो.*

धनंजय:- आज गुरूजी काय करतील.. एक चांगले झालेय.. माझा निर्णय आपोआप सांगून झालाय.. त्यामुळे एक भाग संपला. राहिला गुरूजींचा कोप.. बघूया..

समीर:- ब्रो.. आय थिंक तू तुझ्या सायलीला बोलावून घे. मी पण बोलावलेय.. साय ला..

धनंजय:- साय!

समीर:- धन पेक्षा चांगलेय हे नाव!

धनंजय:- तू म्हणतोस ते ठीक आहे पण.. तुमच्या सगळ्यांसमोर पिरगळू देत माझी मुंडी.. तुम्ही तिघे आत थांबून बघा..

समीर:- कैसे जाता है दम वो देख ले..? पण अजून वेळ आहे.. मी जरा जाऊन येतो. साय आली तर थांबायला सांग..

धनंजय:- सांगतो.. साय ला.. उतू जात होता तुझा उत्साह दुधासारखा आणि काय.. साय!

*समीर जातो..*

धनंजय(स्वगत):-

नाही नाही करत होतो
पण प्रेमच इतके प्यारे की
इश्काची गोड इंगळी जशी चावली..
सायली! एक देखणी सावली..!
माझ्या आजूबाजूला पसरलेली ..

प्रेमाची सावली.. सायली..
किती दिवस.. दिवस कसले.. वर्षे ..
झुरत होती माझ्यासाठी
पण आशा नाही सोडली.. कधी नाही कावली
माझी सावली.. माझी सायली ..
जाई जुईच्या फुलासारखी नाजूक साजूक
प्रेमाने म्हणते ना धन म्हणून
माझ्या काळजात भरून राहिली
माझी सावली.. सायली..
कुठे होतीस इतकी वर्षे
माझ्यावर घेऊन आलीस
तुझ्या प्रेमाची घनदाट सावली..
गोड गोडुली सान सानुली
लाडिक माझी भावली
कशी गं आणि कधी गं येशील
आस तुझी मला पावलो पावली..

वा! गुरूजींच्या तालमीत शड्डू ठोकण्याहून हेच छान.. प्रेमाच्या बोलाच्या कविता ज्या फुटतात आतून आतून..

आपोआप.. उकळी फुटावी दुधास तशी.. त्यावर येते ती साय! म्हणजे समीरची सायली? सायली नंबर एक आणि दोन.. भरून जाणार घर लवकर.. पण आज गुरूजींचा रोष? होईल तेव्हा पाहू.. तोवर आनंदाने विचार फक्त माझ्या सायलीचा..

सायली.. माझ्या प्रेमाची सावली ..
तुझ्या प्रेमाचा ध्यास अन् प्रेमाची आस
माझ्या मनात न मावली ..
सायली.. माझी सायली..

# प्रवेश ४

समीरचे घर. हनुमानाच्या तसबिरीपुढे बसलेला धनंजय. विचारमग्न .. गुरूजी येण्याची वेळ झालीय म्हणून चिंताक्रांत चेहरा.. उठून येरझाऱ्या घालायला लागतो ..

बजरंग गुरूजी येतात ..

धनंजय:- या गुरूजी..

गुरूजी:- आलोच आहे. अजून किती येऊ.. माझ्या शिष्योत्तमाकडे असे यावे लागेल असे वाटले नव्हते मला.

धनंजय:- मी सांगतो गुरूजी .. काय नि कसं ते..

गुरूजी:- काय आणि कसं? जसं काही मला जे दिसलं ते वेगळेच काही आणि तू सांगणारेस ते अजून काही? सांग.. तू काल जोड्याने पाया पडलास ते खोटे.. नि आज सांगशील ते खरे? हनुमंता .. जोड्याने ..

धनंजय:- नाही गुरूजी .. पण तारूण्य सुलभ भावनामुळे ..

गुरूजी:- तारूण्यसुलभ? आम्ही नव्हतो तरूण? नव्हतो कशाला? अजूनही आहोत.. सारा मक्ता तुम्हाला दिलाय?

धनंजय:- गुरूजी .. तुम्ही या शपथेतून सोडवा मला.. वचन मुक्त करा.. म्हणजे सायलीला बरे वाटेल..

गुरूजी:- म्हणजे? तुला बरे नाही वाटणार? तिला फक्त बरे वाटावे म्हणून? आणि मला बरे वाटावे म्हणून काय करणार आहेस तू?

धनंजय:- मी क्षमा मागतो गुरूजी ..

गुरूजी:- क्षमा? त्याने काय होणार आहे? तू तुझा रस्ता निवडलास.. कैवल्यने सांगितलेय सारे.. कोण कोण काय काय केले .. ती एक दोन नंबरची सायली.. तिने फक्त ब्रूस ली बनायचे बाकी ठेवलेय.. सगळं इत्यंभूत ठाऊक आहे मला..

धनंजय:- ते सारे माझी शपथ मोडण्यासाठी..

गुरूजी:- मग मी काय करावे माझी शपथ मोडावी म्हणून?

धनंजय:- नाही गुरूजी.. म्हणजे आम्ही तसा विचार करत होतो.. पण

गुरूजी:- पण काय? मिशन ब्र म्हणे! ते संपले समजा आता.. मिशन सक्सेसफुल..

धनंजय:- म्हणजे? मी आणि माझी सायली?

गुरूजी:- तू इतका अप्पलपोटा असशील असे वाटले नव्हते .. तू आणि तुझी ती.. आणि मिशन ब्र चा भाग ब? त्याचे काय?

धनंजय:- सॉरी गुरूजी..

गुरूजी:- सॉरी? अरे आता मिशन स सुरू करायची वेळ झाली नि..

धनंजय:- मिशन स?

गुरूजी:- आधी त्या तिघांना बाहेर बोलाव..

धनंजय:- कोण?

गुरूजी:- कोण? साळसूदपणे विचारतोयस.. कोण? बोलावतोस की..?

धनंजय:- समीर आणि सायल्यांनो .. गुरूजी बोलावताहेत..

*तिघेही बाहेर येतात ..*

गुरूजी:- आता नीट ऐका.. सगळी गोष्ट तुमची मला ठाऊक आहे.. मिशन ब्र चा भाग ब सकट.. कैवल्याशी बोलणं झालंय माझं.. आता दोन गोष्टी .. एक.. धनंजयच्या कृतीने मला धक्का बसला .. जोराचा.. इतका की माझी दृष्टी बदलली.. आजवर एकाच दृष्टीने जग बघायची सवय.. ती बदलली.. बदलायला लागली

.. त्याला कारण.. आता तुमच्या पासून काय लपवावे? ती सावित्री .. पाहता क्षणी काहीतरी झाले मला.. ती बिचारी रोज जेवू घालते मला.. इतक्या वर्षात असे काही वाटले नव्हते .. आता मला तुमची मदत हवी.. तेव्हा नंबर दोन.. मिशन स.. स सावित्रीचा. तिला कसे काय मनवायचे? तुमच्यासारख्या अनुभवी जणांकडून मार्गदर्शन हवे या गुरूजींस.. तुम्ही माझे शिक्षक या बाबतीत ..

धनंजय:- गुरूजी .. हे सगळं खरंच सांगताय?

गुरूजी:- धनंजया, मी फक्त ब्रह्मचर्याचा त्याग करायचे म्हटले.. सत्यवचनाचा नाही.. सत्यवचनी मी आजही आहे.. नंतरही राहिन.. सावित्री .. मला आवडते ती हे सत्य.. ते लपवून कसे ठेवावे.. काय करावे कळत नव्हते .. आता या मिशन ब्र ने निमित्त दिले..

समीर:- काळजी नको गुरूजी.. आम्ही आहोत..

सायली सीनियर:- हो गुरूजी.. माझा धन पण आहे..

गुरूजी:- धन?

समीर:- धन म्हणजे.. धनंजय.. गुरूजी ..

सायली ज्युनिअर:- गुरूजी.. गरज पडली तर मी खरंच ब्रूस ली बनेन

धनंजय:- म्हणजे गुरूजी .. मिशन ब्र संपली म्हणायची ..

गुरूजी:- यशस्वीपणे अगदीच .. आता..

समीर:- आता नवीन मिशन.. मिशन स .. सुरू..

गुरूजी:- मला अनुभव नाही रे पोरांनो.. पण तुम्हाला वाटते सावित्री मानेल?

सगळे:- वरी नॉट गुरूजी.. आम्ही आहोत..

गुरूजी:- ही हुरहूर काही वेगळीच आहे.. धन म्हणजे धनंजय.. आणि ही ॲक्ट्रेस काय म्हणते समीरला? सॅम? की शमी?

सायली ज्युनिअर:- गुरूजी.. तुम्ही पण ना..

गुरूजी:- काही म्हण पोरी.. लाडाने म्हण.. पण एक प्रश्न पडलाय.. माझी सावित्री मला काय म्हणेल लाडाने.. ही धनंजयला धन म्हणते.. ती सॅम म्हणेल . तसं.. बज? बजा.. की .. रंग? नाहीतर रंगा?

सगळे:- मिशन स नंतर कळेलच ना गुरूजी .. आणि स फॉर सावित्री आणि स फॉर सक्सेस टू .. सो नॉट्टू वरी गुरूजी .. आम्ही आहोतच..

# प्रवेश ५

## स्थळ: समीरचेच घर

सूत्रधार:

तर मंडळी..

तर आहे हे असे आहे.. झाले ते असे झाले.. आता होणार ते कसे होणार? भविष्य जाणे न कोई.. पण भविष्य घडवावे लागते.. खरेतर बजरंग गुरुजी नि सावित्रीबाई.. वाह वाह रामजी.. जोडी क्या बनाई म्हणायला हवे.. तिकडे बजरंग गुरुजी बसलेत गुडघ्याला बाशिंग बांधून .. आता सावित्रीबाईंना कसे पटवावे? ह्या नाटकात आता रंग भरत चालला आहे.. अँज प्राॅमिस्ड.. आता मिशन स यशस्वी व्हायलाच हवे.. मागे सगळे म्हणालेत तसे स फाॅर सावित्री.. स फाॅर सफलता.. स फाॅर सक्सेस.. स फाॅर बोथ सायलीज् टू.. फक्त आता आपल्या नाटकाचा डायरेक्टर कैवल्य .. त्याच्या तिच्या मागे जात जात थेट पोहोचलाय तिच्या गावी म्हणजे अगदी प्रेमाच्या गावा जावे म्हणा.. त्यामुळे ह्या मिशनची जबाबदारी आता

सळसळत्या तरूण खांद्यांवर.. सावित्रीबाई.. पिघळतील का लोण्याच्या गोळ्यासारख्या? आणि स्वतः गुरूजीच आता प्रेमातुर आहेत.. तेव्हा आता काय करणार सगळे मिळून नवीन तिकडमबाजी? पाहूयाच तर..

धनंजय आणि बजरंग दोघे घाईघाईत आत येतात. गुरूजींचा हात बँडेज बांधून गळ्यात लटकवलेला. धनंजय हाताला धरून आत आणतो. गुरूजी बसतात.

समीर: काय झाले गुरूजी?

धनंजय: काय होणार? घडू नये ते घडले..

समीर: म्हणजे? प्रथम तुज पाहता .. म्हणतात तसे? पण मग बँडेज दिलपर होना चाहिए .. दिमागपर नहीं.. साॅरी हाथ पर नहीं..

धनंजय: गुरूजी दुखतंय का खूप? थोडी कळ काढा. लवकरच ठीक होईल..

समीर: म्हणजे? थोड्यावेळात आपोआप ठीक होणार डाॅक्टर धनंजय?

धनंजय: अरे तालमीत तो शड्डू ठोकला.. दंड उचलला .. नि तोच तोल गेला..

गुरूजी: बॅलन्स म्हण धनंजय .. माझा तोल तसा गेला नाही. अरे आजन्म ब्रह्मचारी मी. असा तोल ढळत नाही.

धनंजय: आजवर नसेल ..पण आता परिस्थिती बदललीय गुरूजी .. पण आता येतीलच सावित्रीबाई.. यायची वेळ झालीच आहे. हातास इजा. त्यातून उजवा हात..

गुरूजी: दुखतोय रे हात.. हलवू देत नाही अगदी ..

समीर: सावित्रीबाई? अरे आज सकाळीच दोन्ही वेळचं जेवण बनवून गेल्यात. त्यांना कुठेतरी जायचंय म्हणाल्या. तशी काळजी नसावी .. म्हणजे अगदी आठवणीने गुरूजींचा डबा पण देऊन गेल्यात..

गुरूजी: म्हणजे? सावित्री नाहीये आज?

समीर: नाही. का?

गुरूजी: सारी मेहनत पाण्यात .. धनंजया.. सोड ते बँडेज.. हात आखडून गेलाय.. सावि.. तुझ्यासाठी अडकवला मी गळ्यामध्ये हात..

समीर: म्हणजे गुरूजी?

धनंजय: त वरून तपेली.. समीर समझा करो..

समीर: बापरे! गुरूजी तुम्हीसुद्धा?

गुरूजी गळ्यात लटकवलेला हात बाहेर काढतात. धनंजय बँडेज सोडवत बसतो. सोडवून खाली टाकतो.

गुरूजी: मला वाटलं हाडबिड मोडलं की तिच्या हृदयाला पाझर फुटेल.. तीन आठवड्याची निश्चिंती..

धनंजय: त्यात उजवा हात..

समीर: सावित्रीबाई करतील सेवा.. गुरूजी मिळवतील प्रेमाचा मेवा..

गुरूजी: कैवल्या.. कुठे नाहीसा झालास तू.. नाटक करायचे तर सगळ्या अंगानी विचार करावा लागतो.. चांगला प्रोड्यूसर आणि डायरेक्टर हवा रे..

समीर: खरंय, तेथे पाहिजे जातीचे..

धनंजय: गुरूजी.. वरी ना ॅट. आजचा खेळ उद्या

परत..

समीर: होय गुरूजी, महाराष्ट्र राज्य लाॅटरी का फल.. आज नहीं तो कल..

धनंजय: परत बँडेजचा खर्च होईल तोच.. पण उद्या परत येऊ आपण.. असेच

गुरुजी: होय..

उजेड फक्त गुरूजींवर

गुरूजी: अरे, दंड बैठका मारताना पण मला सावित्रीची आठवण येते नि तिच्या हातच्या जेवणाची चव अजून जिभेवर रेंगाळते.. आजवर घेतलेली ती शपथ.. ती बारगळली.. ते छानच झाले. पण इतके छान होईलसे नव्हते वाटले. आज परत ते दिवस परत आलेले वाटतात.. कोणाची तरी ओढ वाटते .. उगाच कविता कराविशी वाटते.. वाटते काय.. ही पहा कविता झालीच.. नव्हे आपसूक आलीच..

सावि तुजवर फिदा असा

तू येशील नेसून गुलाबी साडी
जमेल जमेल जमेल जरूर
ही तुझी न माझी जोडी

गडे तू अशी कशी ग
ओळखली माझी नाडी
जमेल जमेल जमेल जरूर
ही तुझी न माझी जोडी

मी तुझाच अन तू माझी
तू इंजिन तर मी गाडी
जमेल जमेल जमेल जरूर
ही तुझी न माझी जोडी

छे! कविता बिविता काय? साडी आणि नाडी? इंजिन आणि गाडी? पण काय हरकत आहे? सच्ची भावना असेल तर शब्दांची काय मातब्बरी?

जोडू आम्ही इंजिनास ही गाडी नचतर कशी जमावी जोडी? कुणी ऐकत नाही म्हणून बरेय.. नाहीतर हसले असते सारे. हसोत. ती कुणीतरी म्हणालेली ओळ आठवते.. ये प्यार भी कितना प्यारा है.. कोणाला पटेल हा बजरंग इतका बदलला? सावि काय म्हणेल मला? बजा.. रंगा.. नाथ.. रंगनाथ.. की गुरूजीच म्हणेल? पण कधी म्हणेल? आणि म्हणेल ना? माझी सावि.. तुझ्या साठी बनेन हा पैलवान ही कावि.. नाही कवी..

*प्रकाश परत पूर्ववत.*

धनंजय: गुरूजी, असे शांत शांत?

समीर: शांत नव्हे .. ते आहेत विचारांत.. न तुटता तुटलेल्या हाडाची कहाणी .. कुणाची प्रेमकथा कशी आकारास येईल सांगता येत नाही. गुरूजी न तुटलेल्या हाडास सांधता सांधता दोन दिलांना सांधतील.. मग एकाच मंडपात चार सामूहिक विवाह समारंभ होतील..

धनंजय: चार?

समीर: अर्थात. रायटर डायरेक्टर कैवल्यास विसरून कसे चालेल.. तूर्तास ते आपल्या गावी प्रेमाच्या गावा जावे चे प्रयोग करण्यात मग्न आहेत.. आणि गुरूजी इकडे तेच प्रयोग करताहेत.. मला वाटते गुरूजी यशस्वी होणार.. होणारच..

सावित्री एकाएकी आत येते..

सावित्री: कशात यशस्वी होणार गुरूजी?

सगळे दचकतात..

समीर: तुम्ही? तुम्ही येणार नव्हतात?

सावित्री: आले. नाही गेले.. मग म्हटले तुम्हाला थंड जेवण कशाला?

धनंजय: थंड कसले? गरम करून घेतले असते.. हां ह्या गुरूजींबद्दल माहिती नाही. नाही म्हणजे त्यांना चुलीजवळ जायची सवय नाही ..

समीर: (हळूच) आणि आजवर जेवढी होती ती मोडून बसलेत..

सावित्रीचे लक्ष जवळ पडलेल्या बँडेजवर जाते..

सावित्री: बाई बाई.. हे काय? कुणाला दुखापत झाली? असले बँडेज? हाड बिड तुटले की काय?

मी होते ना हाॅस्पिटलात कामाला. हाड तुटले की असे गळयात बांधतात..

धनंजय: समीर हे काय आहे? इथे?

गुरुजी: समीर.. माझे पण आताच लक्ष गेले.. हे काय?

समीर: अरे जिभेचे हाड मोडले होते त्याचे बँडेज आहे..

सावित्री: काय?

समीर: त्या कैवल्याचा हात मोडणार होता .. पण नाही मोडला.. म्हणून बँडेज असाच टाकून गेला..

सावित्री: म्हणजे हो?

धनंजय: हा समीर ना काहीही बोलत असतो..

गुरूजी: नायतर काय!

सावित्री: हाड तुटले की असा हात गळ्यात.

गुरूजी: खरंच?

सावित्री: तर हो.. त्यात तो उजवा असला ना तर बघायला नको.

गुरूजी: खरंच?

सावित्री: तर हो.. मग पेशंटला खाऊ पिऊ घालायचे..

गुरूजी: खरंच?

सावित्री: तर.. बाई बाई.. पेशंटचे हाल नुसते ..

गुरूजी: खरंच?

सावित्री: तर.. कामच काम नुसते.. पण कुणाचे बँडेज?

समीर: काही नाही हो.. माझे काही मित्र आलेले. आम्ही बँडेज बँडेज खेळत होतो..

सावित्री: कायतरी खेळ बाई. आजकालच्या पोरांचा काही नेम नाही. होय की नाही गुरूजी..

गुरूजी सावित्रीबाईंकडे पाहात तंद्रीत बसलेले. एकाएकी दचकत..

गुरूजी: होय ना.. सावि.. त्री बाई.

समीर: आजकाल कशाचाच नेम नाही राहिला ..(हळूच) नि कुणाचाच नेम नाही राहिला ..

सावित्री: चला. मी तेवढे जेवण गरम करून जाते.. तुमचा डबा ठेवलेला गुरूजी..

धनंजय: मी देतो गुरूजींना. आणि आम्ही घेऊ गरम करून. तुम्ही उद्या जाणार आहात का?

सावित्री: कुठे?

धनंजय: नाही म्हणजे येणार आहात का?

सावित्री: कुठे?

धनंजय: कुठे काय? इथे! नाही म्हणजे तशा तयारीने राहायला..

सावित्री: कसली तयारी?

धनंजय: म्हणजे तुम्ही नसाल तर जेवण बनवायची तयारी ..

गुरूजी: हो ना. माणसाला यायला पाहिजे जेवण बनवायला ..

सावित्री: तर हो.. पण मी असताना कसली चिंता .. आणि परवा ताई परत येतातच आहेत.

समीर: ते ही खरंच.. गुरूजी..

सावित्री: मग मी निघू..?

प्रकाश फक्त गुरूजींवर

गुरूजी:

नकोस जाऊ सोडून.

माझ्या मनीची आस अशी मोडून

तू असलीस की न कळती घटिका आणि पळे.. तुला पाहून अचपळ मन माझे असे का पळे?

नकोस जाऊस सोडून तोडून हृदयीच्या तारा..

नसतेस तू तर भासे व्यर्थ हा सर्व जगाचा पसारा..

प्रकाश पूर्ववत

धनंजय: चालेल बाई. आम्ही सांभाळून घेतो.

गुरूजी: हो ना. हेच सांभाळतील..

सावित्री निघून जाते..

समीर: आता बोंबला.. लेट्स बोंबल नाऊ..

गुरूजी: व्हाय? कशाला?

समीर: कशाला काय? आता बँडेज आऊट. आता नवीन काहीतरी ट्रिक.. आपल्याकडे फक्त उद्याचा दिवस आहे.. बाईंना ही आताच टपकायचे होते.

गुरूजी: नकोस रे असा निर्दयीपणे बोलूस. ती आली ती पाच मिनिटे मी हृदयकप्प्यात ठेवली आहेत. आता पुढील चोवीस तास त्या आधारावर काढायचे आहेत.. सावि.. माझी सावि..

धनंजय: होय.. तीच तुमची भावी..

गुरूजी: मिशन ब्र आणि मिशन स.. जमेल ना रे? जमेल जरूर तिची माझी जोडी..

# प्रवेश ६

स्थळ

समीरचेच घर

सूत्रधार:

नमस्कार मंडळी.

काय म्हणता? नाही, मध्ये बऱ्यापैकी काळ उलटून गेलाय. द ग्रेट बँडेज ट्रिक नंतर दीड दोन महिने उलटून गेले आहेत. त्यानंतर समीर आणि धनंजय तुझी माझी जोडी म्हणत आपापल्या प्रेमकहाणीत रंगले.. दंगले.. कैवल्य प्रेमाच्या गावी जाता झाला.. म्हणजे जिसे भी देखिए अपने ही धुन में मगन.. गुरूजींचा पत्ता नाही. धनंजय तालमीत शोधून आला तर गुरूजी बेपत्ता. सावित्रीबाई स्वयंपाकाला यायच्या बंद झाल्या. थोडक्यात सगळीकडे सामसूम. सन्नाटा.. अगदी इतना सन्नाटा क्यूं है भाई म्हणायला ही कोणी नाही!

पण गुरूजींच्या मनातले प्रेमाचे वादळ अशातशाने शमले म्हणावे का? प्रेमाची लागलेली आग.. निखाऱ्यावर राख

जमली का? शक्य नाही. त्या आगीत वितळून शपथ मोडून पाणी पाणी झालेला त्यांचा जीव.. पाण्याला बंधारा घातला तरी त्याचा आवेग प्रचंड असेल तर तो बांध फोडून बाहेर पडणारच.. गुरूजींचे असेच काही झाले असेल का? शक्यता हीच अधिक आहे..

एक रविवार सकाळ. धनंजय आणि समीर घरी आहेत.. आईवडील बाहेर कुठेतरी गेल्याने घरात मोकळे रान आहे. आपापल्या सायलीबरोबर प्रेमाच्या गप्पा चालल्या आहेत.. बाहेरील जगाशी संबंध नसल्याप्रमाणे मांजरीसारखे डोळे मिटून दूध पिणे सुरू आहे.

आणि अशात.. जोरका धक्का धीरेसे..

होय मंडळी, अंदाज खरा आहे. प्रेमाच्या आवेशाने नि आवेगाने गुरूजी धडक कार्यक्रम आखत जोरका धक्का मारायला सज्ज झाले आहेत. म्हणजे सज्ज होऊन सारे काही करते झाले आहेत..

काय झाले? उत्सुकता ताणत नाही .. दोनच दिवसांपूर्वीची ही गोष्ट .. बघाच फ्लॅशबॅक मध्ये ..

*आधी काळोख.*

*मग उजेड पडतो तेव्हा धनंजय, समीर आणि त्यांच्या दोन्ही सायल्या बसून काही बोलताहेत. दरवाजातून गुरुजी आणि सावित्रीबाई आत शिरतात. गळ्यात लग्नात घालतात तसे हार.. हातात हात धरून नवदांपत्य वाटावे असे येतात ..*

गुरूजी: काय धनंजया, आहेस का? तुमच्या प्रेमव्यासंगात व्यत्यय तर नाही ना आणला?

सगळे दचकून बघतात नि आ वासून बघत राहतात .. सावित्रीबाई लाजतात.

गुरूजी: असे बघताय काय? झापडं मिटा. आणि पाया पडा माझ्या. कित्येक दिवस तालमीत आलेला नाहीस धनंजय..

चारी जणं आज्ञाधारकपणे गुरूजींच्या पाया पडतात.

गुरूजी: सुखी रहा पोरांनो..

धनंजय: तुम्हीच नव्हतात.. मी दोनदा येऊन गेलो..

गुरूजी: अर्थात .. तालिमी व्यतिरिक्त अजून काही काम नाही का या बजरंगास?

समीर: अर्थात आहेत गुरूजी.. दिसतेय ते समोरच.. हो की नाही साय?

सायली ज्युनिअर: हो ना समी..

सायली सीनियर: धन, तुला मी म्हणाली ना, गुरूजी बिझी असणार ..

धनंजय: खरंय तुझं जानू..

गुरूजी: तर आहे हे असे आहे. आजच आम्ही देवाच्या साक्षीने विवाहबद्ध झालो.. सावि..

धनंजय: पण हे सगळे कसं काय .. सावित्रीबाई..

सावित्रीबाई लाजतात..

सावित्री: मी जरा आत देवाला साखर चढवते..

लगबगीने आत निघून जातात.

धनंजय: गुरूजी.. तुम्ही सगळ्यांचे गुरू निघालात.. डायरेक्ट लग्नच उरकून आलात..

गुरूजी: काय सांगू? सावि नाही तितक्यात सांगून टाकतो..

सायली ज्युनिअर: सांगा गुरूजी.. तुमची प्रेमकथा. सुरस आणि..

गुरूजी: चमत्कारिक .. नव्हे, खरेतर चमत्कार म्हणावा अशी. तर ऐका..

सायली सीनियर: धन.. ऐक..

धनंजय: होय.. माझ्या प्राणकलिके.. ऐकतोय..

सायली सीनियर: किती रोमँटिक ना धन..

धन: यस डिअर.. माझ्या प्राणपाखरा..

गुरूजी: आता मध्ये कोणी बोलू नका..

सायली सीनियर: धन तुला सांगतात गुरूजी..

गुरूजी डोळे वटारून बघतात.. तसे सगळे शांत बसतात.

गुरूजी: तर त्या बँडेज ट्रिक नंतर दोन दिवसांनी सावित्रीच्या घरून मला अर्जंट बोलावणे आले.. सावित्रीचा हात फ्रॅक्चर झाल्याचा निरोप .. बिचारी घसरून पडली.. नि गळयात हात बांधून बसली.. मदतीसाठी कोणाला बोलावणार .. म्हणून मग माझी आठवण आली..

धनंजय: डावा की उजवा? हात?

गुरूजी: डावा.. तशी हुशार आहे ती..

समीर: म्हणजे? तुमच्याहून हुशार?

गुरूजी: हो ना. ती नाही तोवर सांगून टाकतो.. आपलीच ट्रिक तिने माझ्यावर वापरली..

धनंजय: म्हणजे? उगाचच बँडेज?

गुरूजी: हो ना. मला वाटलेच.. मी हळूच पाहिले लपूनछपून.. मी नसताना गळ्यातली दोरी काढून बिनधास्त हात हलवायची ..

सायली सीनियर: किती रोमँटिक ना धन!

धनंजय: होय ग माझ्या प्राणप्रिये..

गुरूजी: मग मला वाटले.. आपण मिशन ब्र नि मिशन स चालवतोय.. तर माझी सावि मिशन ब म्हणजे मिशन बजरंग का नाही चालवणार? तिला तर ह्या बाल ब्रह्मचाऱ्याच्या ब्रह्मचर्याचा भंग करायचा होता..

सायली ज्युनिअर: म्हणजे गुरूजी चीत?

गुरूजी: चीत? सपशेल चीतपट..

समीर: आणि तसेही गुरूजी स्वतःची विकेट द्यायला तयार होतेच.. ह्या धन भाऊरायासारखे.

सायली सीनियर: भाऊराया काय रे?

धनंजय: अगं त्याचा मी भाऊच नाही का प्रिये?

समीर: बाई ग्रेट आहेत पण. बाईंनी तुमचीच आयडिया वापरली .. गुरूची विद्या गुरूला..

सायली सीनियर: समीर.. ही विद्या कोण? धन तू ओळखतो ना तिला?

धन: ही विद्या म्हणजे ती विद्या नाही जान..

सायली सीनियर: मग ठीक आहे धन..

गुरूजी: तर झाले ते असे झाले..

समीर: इतक्या थोडक्यात गुरूजी? मग पुढे .. प्रपोझल वगैरे जरा डिटेल्स ..

गुरूजी:  तीन चार आठवडे साविच्या हाताची सेवा केली.. नि शेवटी तिचा न तुटलेला हातच हातात घेतला.. बाकी शिष्यांनी नाक खुपसू नये.. आम्ही पण तुमच्या प्रेमकथेचे फळस्वरूपच पाहात आहोत या सायलींच्या रूपाने.. बाकी डिटेल्स विचारले कधी आम्ही? तेव्हा .. झाले ते असे झाले..

सायली सीनियर: किती रोमँटिक ना धन?

समीर: इतक्या वेळा विचारशील तर तुझा धन निर्धन होईल..

सायली सीनियर: हो का रे धन?

धनंजय: त्याच्याकडे नको लक्ष देऊस प्राणलतिके.. तो काहीही बोलत असतो.. त्याच्या साय ला विचार ..

सायली ज्युनिअर: माझा समी तसा बोलतो जास्त .. जास्तच .. पण

समीर: पण तरी तो माझा आहे असंच ना साय?

गुरूजी: तुम्ही तुमच्या प्रेमसंवादांस पुढे सुरू ठेवा.. आम्ही निघतो. सावि अगदी देवाचरणी लीन झालेली दिसतेय. मिसेस सावि..

चलायचं का? देवास नमस्कार करून झाला असेल तर निघूया..

सावित्री: आले.. येतेय..

सावित्रीबाई बाहेर येतात..

सावित्री: अहो, ताई नाहीत घरी. त्यांना भेटून गेलो असतो ..

धनंजय: आई गेलीय बाहेर. रात्री येईल..

सावित्री: ताईंची खूप मदत असते हो. त्यांचा आशीर्वाद घ्यायला हवा..

गुरूजी: परत येऊ आपण सावि .. आता निघूया.. चल सावि..

दोघे हातात हात घालून निघतात..

सगळे हात हलवून निरोप देतात.. मग धनंजय आणि समीर आपापल्या सायलीचा हात हातात घेऊन उभे राहतात..

पाठून आवाज.. जमली जमली जमली आता तुझी माझी जोडी..

रंगमंचावर काळोख..

सूत्रधार:

तर असं सगळं आहे मंडळी. इतिहास असा आहे.. इति.. हास! इति झाले आणि हासू आले! म्हणजे झाले ते असे झाले.

म्हटले ना.. माणसाची भविष्ये एकमेकांशी निगडीत असतात. सायसमीर नि सीनियर सायली तिच्या धन सह.. 'तुझी माझी जोडी' जमल्याचा बाॅम्ब आपापल्या घरी फोडण्यास तयार आहेत. पण सर्वांवर कडी केलीय ती कानामागून येऊन तिखट झालेल्या बजरंग गुरूजींनी. अगदी

आपल्या प्रकृतीच्या विपरीत गुरूजी मारूती स्तोत्राऐवजी मदनाचे बाण मारत काव्य करायला लागलेत ..

आणि अजून एक..

आताच हाती आलेल्या वृत्तानुसार.. तिकडे प्रेमाच्या गावी कैवल्य आणि त्याची केतकी यांची जोडी जुळत असल्याची बातमी आमचा वार्ताहर कळवतो..

तेव्हा मंडळी.. जोड्या जुळण्याचा नि जुळवण्याचा हा कार्यक्रम आता संपन्न होत आहे. आणि आता आमच्या चार ही जोड्या जरा बिझी आहेत.. तुम्ही समजून घ्यालच. त्यामुळे निरोप घ्यावा लागेल ..

पण पुढे मागे भेटूच ..


जीवनाशी एकनिष्ठ राहिल्याची बातमी घेऊन.. काय मग? भेटता ना परत?


---(समाप्त)---


डॉ. नितीन मोरे यांची ३६+२ प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.





































डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
वाळूतील रेषा



राग दरबारी
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



आधुनिक कहाण्या



डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
सांगतो ऐका


डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे







डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी

डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
ई बुक
+ऑडिओपुस्तक
+व्हिडिओपुस्तक

अंजतईय
डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस

डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता

डॉ. नितीन मोरे
रोमिओची 'परी'कथा

डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २
ढेप, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ..

सुलट २७६
डॉ. नितीन मोरे

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे सदतिसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन

मोरे (३७), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३४), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२१), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(५), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(२), मंगेश चौधरी, बंकटलाल जाजू(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन

व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ‘‘इ’’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।